**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२११

निर्णय दिनांक ०१-०६-२००७

श्री. गजानन विठ्ठल पाटील, : अपीलार्थी
मोंढा रोड, गंगापूर तालुका गंगापूर
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हाधिकारी औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. गजानन विठ्ठल पाटील हे गेरहजर आहेत तर , जन माहिती अधिकारी तथा संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद श्री. अरुण लक्ष्मण डुबे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), त्यांच्या

कार्यालयातील सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री. ढगे डी. एस. व विस्तार अधिकारी श्री. बी. जी. थोरात हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थी यांनी प्रथमतः जन माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक ०१-११-२००६ रोजी अर्ज करुन खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> ''(१) औरंगाबाद जिल्ह्यातील बीपीएल धारकांची संख्या (२) २००५-२००६ काळात त्यांना झालेला धान्य पुरवठा आणि वाटप केलेले धान्य शिल्लक तपशील गावानुसार यादी.''

सदर माहिती अपीलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली असून ती २००५-०६ या कालावधीतील आहे.

अपीलार्थीने वरील मागितलेली माहिती शासनाच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व जिल्हा पुरवठा अधिकारी या दोन वेगळ्या प्रकरणाशी संबंधित असून अपीलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकत्रितपणे अपेक्षिली आहे. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीतील जो भाग जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित नाही त्या भागा संबंधी अपीलार्थीने विचारलेली माहिती अपीलार्थीच्या मूळ अर्जासह जन माहिती अधिकारी यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्याकडील पत्र क्रमांक २२३७, दिनांक ०६-११-२००६ अन्वये संबंधित विभागाकडे म्हणजे जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद यांना पाठविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामुळे दिनांक ०७-०१-२००७ रोजी अपीलार्थीने जन अपीलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे प्रथम अपील केले. या अपीलावर सुनावणी झाली किंवा कसे हे कळण्यास काहीही मार्ग नाही. कारण आज सुनावणीसाठी जन अपीलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी औरंगाबाद हे विनापरवानगी गैरहजर राहिले आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची आयोगाने सखेद

नोंद घेतली आहे.  यापुढे आयोगाकडून त्यांना ज्या ज्या वेळी आयोगातर्फे सुनावणीसाठी बोलाविले जाईल त्या त्या वेळी त्यांनी आयोगासमोर हजर राहावे अशा सूचना त्यांना महसूल आयुक्त औरंगाबाद विभाग यांनी द्याव्यात असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) नुसार दिनांक ३०-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की त्यांच्या कार्यालयाशी संबंधित असलेला मुद्दा क्रमांक १ ची माहिती अपीलार्थीस त्यांनी सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांच्या मार्फत तोंडी दिली आहे व त्याप्रमाणे त्यांनी आयोगासमोर शपथपत्रावर लिहून दिले आहे.  तथापि माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये कोठेही तोंडी माहिती देण्याची तरतुद नाही.  अपीलार्थीस या कायद्यान्वये त्यांनी मागितलेली माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये विहित केलेल्या पध्दतीनुसारच दिली गेली पाहिजे.  अपीलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा मुद्दा क्रमांक २ संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद किंवा जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी आयोगापुढे येऊन त्यांचे म्हणणे नोंदविणे आवश्यक होते तथापि या दोन्ही अधिका-यापैकी कोणीही अधिकारी आज आयोगासमोर हजर झाला नाही.  त्यांचे हे वर्तन त्यांच्यातील बेपवाई व राज्य माहिती आयोगा च्या प्रती त्यांच्या मनात असलेला अनादर स्पष्ट करते.  महसूल आयुक्त औरंगाबाद यांनी याची गांभीर्यपुर्वक दखल घेऊन त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अधिका-यांनी आयोगाच्या सुनावणीस, त्यांना बोलाविणे आल्यास न चुकता हजर राहण्याच्या सूचना त्यांच्या स्तरावरुन द्याव्यात असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस तोंडी माहिती दिली हा युक्तीवाद पटण्या सारखा नाही.  त्यांनी अपीलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत त्यांच्या

विभागाकडील व त्याच बरोबर जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडील संबंधित माहिती अपीलार्थीस विनामूल्य व स्वाक्षांकित करुन पुरवावी असे आदेशित करण्यात येत आहे. या प्रकरणी जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जो कर्तव्यपरायणतेचा अभाव दर्शविला आहे त्याची नोंद महसूल आयुक्त औरंगाबाद विभाग यांनी घेऊन त्यांच्यावर यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी / प्रस्तावित करावी असे त्यांना सुचित करण्यात येत आहे व अपील मान्य करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा औरंगाबाद यांनी त्यांचे कडील व जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद यांचे कडील माहिती एकत्रित करुन घेऊन अपीलार्थीस ७ दिवसाच्या आत स्वाक्षांकित करुन विनामूल्य पुरवावी व त्याचा अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आयोगास पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१ जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन विठ्ठल पाटील, मोंढा रोड, गंगापूर तालुका गंगापूर जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद यांना निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय आयुक्त (महसूल) औरंगाबाद विभाग यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा पुरवठा अधिकारी औरंगाबाद यांना निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२८

निर्णय दिनांक ०१-०६-२००७

श्री. नळगीरकर शेषराव दिगंबरराव, : अपीलार्थी

३०१, श्रीकृष्ण, क्रांतीनगर, निडेबन, तालुका

उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा मुख्याध्यापक शांतीनिकेतन विद्यालय

कोदळी तालुका उदगीर जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा

परिषद लातूर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. नळगीरकर शेषराव दिगंबरराव (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक शांती निकेतन विद्यालय कोदळी तालुका उदगीर जिल्हा लातूर श्री. मोरतळे निळकंठ भाऊराव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद लातूर श्री. जे. डी. साळूंखे (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २९-०९-२००६ रोजी केलेल्या अर्जामध्ये, अपीलार्थी यांची शैक्षणिक वर्ष १९९६-९७ ची वैयक्तीक मान्यता उशीरा ( पाच वर्षानंतर) घेऊन त्यांचे आर्थिक नुकसान करण्याची कारणे कोणती याचा तपशील जन माहिती अधिकारी यांना मागितला होता.

सदर माहिती अपीलार्थीने पोच देय नोंद डाकेने अपेक्षिली होती आणि या माहितीचा कालावधी शैक्षणिक वर्ष १९९६-९७ हा होता.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या या पत्रावर त्यांचे कडील दिनांक १४-१०-२००६ च्या पत्रान्वये, ‘‘आपली नेमणूक सचिव संस्कार शिक्षण संस्था उदगीर यांनी केली असल्यामुळे आपणास आवश्यक असलेली माहिती आपण सचिव संस्कार शिक्षण संस्था उदगीर यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी’’ असे उत्तर दिले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तरावर समाधान न झाल्याने अपीलार्थीने दिनांक ३०-१०-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. या अपीला मध्ये त्यांनी आपली माहितीची मूळ मागणी कायम ठेवली आहे.

अपीलार्थीच्या या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २०-११-२००६ रोजी त्यांचे कार्यालयात सुनावणी ठेवली होती. तथापि जन अपीलीय अधिकारी यांच्या कडील सुनावणीचे पत्र जन माहिती अधिकारी व अपीलार्थी या दोघांनाही वेळेत प्राप्त न झाल्यामुळे ही सुनावणी त्या दिवशी वेळेत होऊ शकली नाही. तथापि तदनंतर शिक्षण संचालकाच्या दिनांक ३०-०८-२००६ च्या पत्रानुसार जन अपीलीय अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद हे राहिले नसून संबंधित संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांची जन अपीलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे अशा अर्थाचे शिक्षण संचालकांचे कार्यालयाकडून शिक्षणाधिकारी (माध्यामिक) जिल्हा परिषद लातूर यांना पत्र प्राप्त झाल्याने त्यांनी या प्रकरणी पुढे सुनावणी घेतली नाही. या प्रकरणामध्ये जन अपीलीय अधिका-यामध्ये झालेला बदल शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद लातूर यांनी तात्काळ अपीलार्थीच्या नजरेस आणून देणे आवश्यक होते तथापि त्यांनी त्या प्रमाणे कोणतीही कृती केली नाही. जर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद लातूर यांनी या प्रकरणाची वेळीच दखल घेऊन अपीलार्थीस योग्य ते मार्गदर्शन केले असते तर अपीलार्थीस आयोगाकडे व्दितीय अपील करावे लागले नसते.

जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०२-२००७ रोजी (सदर अपील हे आयोगास दिनांक १५-०२-२००७ रोजी प्राप्त झाले आहे) व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले की अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची वैयक्तीक मान्यता शिक्षण संचालकाकडून उशीरा प्राप्त करुन घेतल्याची कारणे विचारली आहेत. अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील जन माहिती अधिका-यांना कोणतीही कारणे अथवा अभिप्राय विचारण्याची तरतूद कायद्यामध्ये नाही हे अपीलार्थीस स्पष्ट करण्यात आले. अपीलार्थीस सदर उशीराची कारणे शोधावयाची असल्यास अपीलार्थीने त्यांच्या नेमणुकीच्या मान्यतेसंदर्भात सदर संस्थेकडे उपलब्ध असलेल्या नस्त्या पाहण्यासाठी वेगळी लेखी मागणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील प्रचलीत तरतुदीनुसार केल्यास त्यांना त्यांची वैयक्तीक मान्यता उशीरा प्राप्त होण्याची कारणे कळू शकतील. सदर नस्ती शांतीनिकेतन विद्यालय कोदळी तालुका उदगीर यांच्याकडे सध्या ती उपलब्ध नसून ती संस्कार शिक्षण संस्था उदगीर यांच्याकडे असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले तेव्हा अपीलार्थीस या विषयावरील त्यांची माहिती मिळण्या करिता संस्कार शिक्षण संस्था उदगीर यांच्याकडे संबंधित नस्ती पाहण्यासाठी वेगळ्याने अर्ज करावा लागेल. अपीलार्थीकडून अशा प्रकारचा अर्ज प्राप्त झाल्यास जन माहिती अधिकारी संस्कार शिक्षण संस्था उदगीर यांनी, प्राधान्याने सदर नस्ती पाहण्याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलार्थीस उपलब्ध करुन करुन द्यावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. तसेच याबाबत अपिलार्थीस नस्ती उपलब्ध करुन देण्यासाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद लातूर यांनी त्यांना सहकार्य करावे अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे.

अपीलार्थीस जन माहिती अधिका-याची कारणे विचारण्याची तरतुद नसल्याने व त्यांनी चुकीच्या जन माहिती अधिका-याकडे अर्ज केला असल्यामुळे अपीलार्थीचे आयोगाकडे केलेले त्यांचे दिनांक ०५-०२-२००७ / १५-०२-२००७ रोजीचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१ जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नळगीरकर शेषराव दिगंबरराव, ३०१, श्रीकृष्ण, क्रांतीनगर, निडेबन, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक शांतीनिकेतन विद्यालय कोदळी तालुका उदगीर जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा सचिव संस्कार शिक्षण संस्था, नोबेल कॉलनी, उदगीर जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/२३४/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ०१ जून, २००७.

१. श्री.सुरेंद्र दिंगबर गजभारे, .. अपिलार्थी
व्दारा/- चौधरी डि.ए. चौधरी निवास,
जबरे हनुमान रोड,
जाधवमंडी, औरंगाबाद.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा ..
जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार
मार्गदर्शन केंद्र औरंगाबाद.
२. जनअपिलिय अधिकारी तथा .. प्रतिवादी
सहायक संचालक,
जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार
मार्गदर्शन केंद्र, औरंगाबाद.

## <u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०१ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सुरेंद्र दिंगबर गजभारे (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.),जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, औरंगाबाद, श्री.ओ.एस.जाधव, (जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल.) येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा सहायक संचालक, जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्र, औरंगाबाद, श्री.सुनील दगडू शैगदाणे ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीनी सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक- २७-११-२००६ रोजीच्या अर्जाने जनमाहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या स्वतःच्या संदर्भात एकूण २२ मुद्यावर माहिती मागविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या अर्जात जरी २२ मुद्दे दर्शविलेले असले तरी प्रत्यक्षात त्यांनी २१ मुद्यावर माहिती मागविली असून क्रमांक- १० चा मुद्दा वगळला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली सर्व माहिती त्यांच्या अशंकालीन पदावरील नियुक्ती संदर्भात आहे. अपिलार्थीने या अर्जाव्दारे मागितलेली माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती. अपिलार्थीचे माहिती अर्जाचे अवलोकन करता यातील पाच मुद्दे वगळता उर्वरित सोळा मुद्दे हे अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपात जनमाहिती अधिकारी यांच्याकडे विचारलेले अभिप्राय आहेत. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरणात्मक खुलासा किंवा अभिप्राय अपिलार्थी यांना देणे अभिप्रेत नाही. हे अपिलार्थीस आज सुनावणीमध्ये सांगण्यात आले.

अपिलार्थीने व्यक्तीशः माहिती मागितली असल्याने जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील पत्र क्रमांक- ६३५९/२००६, दिनांक- २१-१२-२००६ अन्वये, अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती त्यांचेकडे तयार असून ती योग्यते मुल्य भरुन दिनांक- ०२-११-२००७ रोजी व्यक्तीशः प्राप्त करुन घेण्याचे सूचीत केले आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्या वरील पत्राच्या सूचना प्रमाणे अपिलार्थी हे जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक- ०२-१-२००७ रोजी हजर झाले.

त्यावेळी अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने माहिती देण्यापोटी येणा-या खर्चाचे चलन करुन दिले. तथापि सदर शुल्क अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नसल्याचे संचिकेतील कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याचे वाटल्यामुळे अपिलार्थी यांनी जनअपिलिय अधिकारी यांचेकडे दिनांक- ०९-०१-२००७ रोजी प्रथम अपिल केले.

या अपिलावर जनअपिलिय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीस दिनांक- १५-०१-२००७ रोजी एक पत्र देवून अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती योग्यते मुल्य भरुन घेवून जाण्याचे कळविले. जनअपिलिय अधिकारी यांची अपिल ठरविण्याची ही कृती बरोबर नाही. अपिल ठरवितांना त्यांनी दोन्हीही बाजूच्या पक्षकारांना बोलावून घेवून त्यांचे म्हणणे ऐकून घेवून त्यावर जनअपिलिय अधिकारी यांनी निर्णय देणे अभिप्रेत आहे. तथापि जनअपिलिय अधिकारी यांनी अशी कोणतीहि कृती न करता, अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी न देता एका पत्राने त्यांचे कार्यालयात उपस्थित राहून माहिती मिळविण्यासाठी शुल्क भरुन माहिती घेवून जाण्याचे सूचीत केले आहे.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलिय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दिनांक- २५-०१-२००७ रोजी सादर केले. या अपिलामध्ये अपिलार्थी यांनी सर्वसाधारणपण आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व त्याच बरोबर जनमाहिती अधिकारी व जनअपिलिय अधिकारी यांच्यावर २५,०००/-रुपये शास्ती

लावण्याची राज्य माहिती आयोगास विनंती केली आहे. हे व्दितीय अपिल करण्याचे कारण म्हणून त्यांनी, "जनमाहिती अधिकारी यांनी संबंधित माहिती जाणूनबुजून चुकीची व दिशाभूल करणारी दिली व माहिती नष्ट केली," असे दिले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे व्यक्तीशः माहिती मागितली असल्यामूळे त्यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दिनांक- २१-१२-२००६ रोजीच्या पत्रा अन्वये अपिलार्थीस त्यांचे कार्यालयात योग्यते शुल्क भरुन व्यक्तीशः माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचीत केले होते व त्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी दिनांक- ०५-०१-२००७ रोजी प्रत्यक्षात माहिती दिली आहे. अपिलार्थीस सदर माहिती मिळाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीची पोंचसही असल्याची कागदपत्रे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगा समोर सादर केली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक- ३,४,१३ व १५ संदर्भात स्पष्टपणे माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही. यापैकी मुद्दा क्रमांक १५ मध्ये अपिलार्थीने "त्यांना फाईल पाहून हवी असलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती" मागितल्या आहेत. त्यांना नेमक्या कोणत्या कागदपत्रांच्या सत्यप्रती हव्या आहेत, हे अपिलार्थी नंतर संबंधीत फाईल बघूनच ठरवू शकतील, त्यामूळे या मुद्यावर अपिलार्थीस उत्तर देणे जनमाहिती अधिकारी अथवा कोणासही शक्य होणार नाही.

या प्रकरणाची प्रार्श्वभूमी समजावून घेतली असता, अपिलार्थी हे शासनाच्या सुशिक्षीत बेरोजगारासाठी अर्थसहाय योजना हया योजनेचे लाभार्थी होते. सदर योजना माहे जुलै २००० रोजी बंद झाली. सदर योजनेचा मूळ उद्देश सुशिक्षीत बेरोजगारांना

शासकीय कार्यालयातील कामाचा अंशकालिन अनुभव मिळून त्याचा सदर अंशकालिन सेवेचा विहित कालावधी पूर्ण झाल्यानंतर शासकीय सेवेमध्ये अशा प्रकारच्या अंशकालीन सेवकांना सेवेची संधी उपलब्ध करुन देणे असा होता. अपिलार्थी या योजनेचे तत्कालीन लाभार्थी होते. त्यांना या योजनेतंर्गत तहसीलदार, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यात आले होते. त्यानूसार त्यांनी माहे नोव्हेंबर, १९९५ ते ऑक्टोंबर १९९८ पय्रंत काम केलेल्या प्रमाणपत्राची नोंद जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात घेतली गेली होती. सदर कालावधी तीन वर्षा पेक्षा कमी असल्यामूळे शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावामध्ये अपिलार्थीचे नाव समाविष्ठ होवू शकले नाही. तद्नंतर त्यांनी सदर कालावधी पूर्ण केला. कालावधी पूर्ण झाल्यानंतर शासनाकडे, अशा प्रकारच्या पात्र उमेदवारांची यादी, जिल्हा रोजगार अधिकारी यांनी पाठवावयाची असते. या यादीत अपिलार्थीचे नाव समाविष्ट करुन घेण्यासाठी अपिलार्थीस या माहितीची आवश्यकता आहे, असे दिसून येते.

सदर योजनेचा लाभ घेत असतांना लाभार्थीने दुसरीकडे कोणतेही शिक्षण घ्यावयाचे नाही, अशी या योजनेतील प्राथमिक अट होती. तथापि अपिलार्थीने (ही अंशकालीन नोकरी करीत असतांना) या काळात दुसरे शिक्षण घेवून पदवी/पदविका प्राप्त करुन घेतल्या व त्यामुळे या अटीचा भंग अपिलार्थी यांच्याकडून झाला असल्याचे जनमाहिती अधिकारी व जनअपिलिय अधिकारी यांनी आज झालेल्या सुनावणीमध्ये सांगितले.

अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, शिक्षण घेणे हा त्यांचा मुलभूत अधिकार असून त्याप्रमाणे त्यांनी शिक्षण घेतले आहे व त्यांनी शासनाने विहित केलेल्या अटी

पूर्ण केल्या असल्याने अंशकालिन उमेदवाराच्या शासनाकडे पाठविण्याच्या प्रस्तावित यादीमध्ये त्यांचे नाव समाविष्ठ करावे.

अपिलार्थीने आपले म्हणणे योग्यत्या प्राधिकरणा पुढे मांडण्याकरिता काही कागदपत्रांची आवश्यकता आहे व ती कागदपत्रे त्यांनी ज्या मूळ माहितीच्या अर्जाव्दारे मागितली आहे. ती माहिती, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पहाणी करता, जनमाहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस "भाष्य नाही" असे शब्द वापरुन काही मुद्यावर माहिती दिली नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्याच बरोबर अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडून खुलासावजा अभिप्राय विचारले आहेत. हेहि तितकेच खरे आहे.

दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकला असता, असे आदेशीत करण्यात येते की, जनमाहती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना अद्याप पर्यंत देण्यात न आलेल्या चार मुद्यावर संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्या पासून तीन दिवसाच्या आत स्वाक्षांकित करुन अपिलार्थीस विनामूल्य द्यावी व त्याच बरोबर अपिलार्थीस या विषयामधील त्यांचेकडील सर्व उपलब्ध नस्त्या अपिलार्थीने, तसा लेखी अर्ज केल्यानंतर, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार, प्राधान्याने अपिलार्थीस उपलब्ध करुन द्याव्यात. वरील विवेंचननासह अपिल निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या विषयासंदर्भातील सर्व नस्त्या अपिलार्थीने तसा लेखी अर्ज केल्यानंतर, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार, प्राधान्याने उपलब्ध करुन द्याव्यात.

औरंगाबाद
दिनांक ०१ जून,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ अपिलार्थी श्री. सुरेंद्र दिगंबर गजभारे, व्दारा/- चौधरी डि.ए. चौधरी निवास, जबरे हनुमान रोड, जाधवमंडी, औरंगाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्र औरंगाबाद , यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा सहायक संचालक, जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्र, औरंगाबाद,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/२५२/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक ०१ जून, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.नसीर खान उस्मान खान<br>दिप पान सेंटर, जायकवाडी कॉलनी<br>गेट जवळ, नगर रोड, बीड<br>तालूका जिल्हा- बीड. | .. | मूळ अर्जदार |
| २. | श्री.शेख राईसोद्दीन चिरागमोद्दीन<br>मुख्याध्यापक,<br>नॅशनल उर्दु माध्यमिक विद्यालय,<br>जूना बाजार, बीड, ता.जि.बीड. | | अपिलार्थी.<br>(त्यावेळचे जनमाहिती<br>अधिकारी) |
| | विरुध्द | .. | |
| २. | जनअपिलिय अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,<br>बीड. | .. | प्रतिवादी |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०१ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी मूळ अर्जदार श्री. नसीरखान उस्मान खान (येथून पुढे मूळअर्जदार असे संबोधण्यात येईल.), अपिलार्थी ( त्यावेळचे जनमाहिती अधिकारी ) तथा मुख्याध्यापक, नॅशनल उर्दु माध्यमिक विद्यालय, जूना बाजार, बीड तालूका- जिल्हा- बीड, श्री.शेख राईसोद्दीन चिरागमोद्दीन, (येथून पुढे अपिलार्थी, त्यावेळचे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) तसेच जन अपिलिय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बीड, श्री.एस.बी.पाखरे, ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणाची आज सुनावणी घेत असतांना असे आढळून आले की, या प्रकरणातील मूळअर्जदार श्री.नसीरखान उस्मानखान हे आहेत व त्यांनी सध्याचे प्रकरणातील अपिलार्थी, त्यावेळचे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नॅशनल उर्दु माध्यमिक विद्यालय, जूना बाजार, बीड  तालूका व जिल्हा- बीड यांच्याकडे दिनांक- १७-०७-२००६ अन्वये नॅशनल उर्दू माध्यमिक विद्यालयाच्या संदर्भात काही माहिती मागविली होती.

सदर माहिती  मिळण्याकरिता मूळअर्जदाराने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे एकूण तीन अर्जाव्दारे काही माहिती मागविली होती. मूळअर्जदाराने मागणी केलेली माहिती मूळअपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक- २१-०८-२००६ व दिनांक- ०९-१०-२००६ या दोन पत्रा व्दारे त्यांना दिल्याचे, आयोगाकडे या सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. मध्यतंरीच्या काळात मूळ अर्जदारास आवश्यक ती माहिती न दिल्यामूळे त्यांनी दिनांक-१२-०९-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बीड यांच्याकडे प्रथम अपिल केले. या अपिलाची सुनावणी गट शिक्षणाधिकारी, बीड यांनी दिनांक- २९-०९-२००६ रोजी ठेवून त्यांनी त्यांचा निर्णय दिनांक- १५-११-२००६ रोजी जारी केला. एवढया विलंबाने निर्णय देण्याचे कारण विचारले असता, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बीड हे कोणतेही समाधानकारक उत्तर देवू शकले नाहीत.

सदर निर्णय अंतिम करतांना जनअपिलिय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नॅशनल उर्दु माध्यमिक विद्यालय, जूना बाजार, बीड

तालूका जिल्हा बीड यांचेवर मूळअर्जदारास माहिती देण्यासाठी केलेल्या विलंबापोटी एकूण १२,७००/- रुपयाचा दंड करण्याची शिफारास त्यांच्या आदेशात केली आहे.

जनअपिलिय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,बीड यांच्या या निर्णयावर सध्याचे अपिलार्थी,जनमाहिती अधिकारी यांनी व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) खाली अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जनअपिलिय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बीड यांनी त्यांच्यावर शास्ती लावण्याचा जो निर्णय घेतला आहे तो निर्णय रद्द करण्याची विनंती आयोगाकडे केली आहे.

संचिकेतील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, माहिती अधिकार अधिनियम १९ (३) खाली ज्या मूळ अर्जदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपिल करणे आवश्यक होते. ते, त्या मूळ अर्जदाराने न करता संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी जनअपिलिय अधिकारी यांनी या प्रकरणी दिलेल्या निर्णया विरुध्द आयोगाकडे अपिल केले आहे. राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये अपिल करण्यास फक्त मूळ अर्जदार सक्षम आहे.

जनअपिलिय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बीड यांनी आज आयोगा समोर केलेल्या युक्तीवादामध्ये असे प्रतिपादन केले की, त्यांनी सदर संस्थेच्या मुख्याध्यापकास दंड करण्याची आयोगा कडे शिफारस केली आहे. तथापि प्रत्यक्षात तो दंड त्यांनी लावलेला नाही.

वरील विवेंचन पहाता, या प्रकरणातील  आयोगा समोर आज उपस्थित झालेले अपिलार्थी व त्यावेळचे जनमाहिती अधिकारी श्री.शेख राईसोद्दीन चिरागमोद्दीन, मुख्याध्यापक, नॅशनल उर्दु माध्यमिक विद्यालय, बीड यांनी आयोगाकडे दाखल केलेले अपिल खारीज करण्यात येत आहे व त्याच बरोबर जन अपिलिय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बीड यांनी राज्य माहिती आयोगास, आयोगाच्या अधिकारात असलेल्या कलमांच्या अंमलबजावणी संदर्भात सविस्तर समर्थना शिवाय शिफारासी करु नये, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

त्याच बरोबर जनअपिलिय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बीड यांनी आज झालेल्या सुनावणीमध्ये आयोगा समोर असे सांगितले की, माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील विहीत केलेल्या तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात त्यांना कोणतेही मागदर्शन त्यांचे कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी करीत नाहीत, तेंव्हा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बीड यांना असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहीत तरतुदीच्या अंमलबजावणीच्या संदर्भात त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कर्मचारी/ अधिकारी यांची  वेळोवेळी कार्यशाळा/ प्रशिक्षण शिबीरे आयोजित करावीत. वरील विवेचनासह अपिल खारीज करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या संदर्भात त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कर्मचारी / अधिकारी यांची वेळोवेळी कार्यशाळा / प्रशिक्षण शिबीरे आयोजित करावीत.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ०१ जून,२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ मूळ अपिलार्थी श्री.नसीरखान उस्मान खान, दिप पान सेंटर, जायकवाडी कॉलनी गेट जवळ, नगर रोड, बीड तालूका जिल्हा बीड.

२ अपिलार्थी श्री.शेख सईसोद्दीन चिरागमोदीन, मुख्याध्यापक, नॅशनल उर्दु माध्यमिक विद्यालय, जुना बाजार,बीड तालूका जिल्हा बीड

३ जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक नॅशनल उर्दु माध्यमिक विद्यालय, जूना बाजार, बीड , यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ जनअपिलिय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बीड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड,यांनी वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ १६८/रामाआ/औ'बाद
सुनावणी ठेवल्याचा दिनांक ०२ जून, २००७.

१.  श्री.कमळाकर जनार्धन पाटील  ..  अपिलार्थी.
हासेगाव (केज) तालूका-कळंब,
जिल्हा- उस्मानाबाद.

विरुध्द

१.  जनमाहिती अधिकारी तथा  ..  प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम, उपविभाग,
कळंब, जिल्हा- उस्मानाबाद.

२.  जन अपिलिय अधिकारी तथा ..
अधिक्षक अभियंता, सार्वजनिक
बांधकाम मंडळ, उस्मानाबाद.

## <u>विवेचन</u>

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-०२ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री.कमलाकर जनार्धन पाटील (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, उस्मानाबाद, श्री.जे.आर.फडणीस (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल.) तर तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कळंब, श्री.आय.ए.हावण्णा (येथून पुढे तत्कालीन जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल.) व जनअपिलिय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद, श्री. सी.पी.जोशी हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> “ कळंब तालुक्यातील २००० ते २००६ मध्ये झालेला रोजगार हमी योजनेमधील कुशल व अकुशल कामांची माहिती मिळणे बाबत २००० ते २००६ मध्ये तालुकात वर्ष वायीज किती कामे मजुर झाले त्यात कुशल व अकुशल मंजुर रक्कम रु., काम किती व शिल्लक राहिलेले रक्कम किती,”

अपिलार्थीचे वरील मागणीचे स्वरुप पाहिले असता, अपिलार्थीस कळंब तालूक्यातील २००० ते २००६ हया कालावधीतील रोहयोमध्ये कामा संदर्भात कुशल व अकुशल कामांची माहिती, एकूण किती कामे मंजूर झाली. त्यामध्ये कुशल व अकुशल भागाची किंमत किती, आतापर्यंत झालेली कामे व शिल्लक राहिलेली कामे, हा तपशिल दिसून येतो. अपिलार्थीने आज झालेल्या सुनावणीमध्ये यास दुजोरा दिला आहे.

दिनांक-१०-०२-२००६ रोजी कार्यरत असलेले तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे उपविभागीय अभियंता या स्तरावरील अधिकारी होते. सार्वजनिक बांधकाम विभागाने तद्नंतर जनमाहिती अधिका-याचा स्तर ऊंचावून कार्यकारी अभियंता या पातळीवरील अधिका-यास जनमाहिती अधिकारी म्हणून नेमणूक दिली आहे तर अधिक्षक अभियंता या पातळीवरील अधिकारी यांना जनअपिलिय अधिकारी म्हणून नेमणूक दिली आहे, या बदला संदर्भात जुलै, २००६ मध्ये खात्याने आदेश निर्गमीत केले आहेत.

अपिलार्थीने  दिनांक- १०-०२-२००६ रोजीच्या अर्जा अन्वये माहिती मागविली आहे. त्या दिवशी संबंधीत उपअभियंता हे जनमाहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यामूळे अपिलार्थीने तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केलेला अर्ज बरोबर ठरतो.

तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक- १०-०२-२००६ रोजीच्या अर्जावर उत्तर देतांना त्यांचेकडील कार्यालयीन पत्र क्रमांक लेखा/माअ/१७०, दिनांक- १०-०३-२००६ अन्वये अपिलार्थीची ही मागणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ ( IX ) अन्वये फेटाळली असल्याचे कळविले आहे. सदर माहिती देण्यामागे त्यांच्या कार्यालयातील साधनसामूग्री प्रमाणाबाहेर वापरावी लागत असल्याचे कारण त्यांनी या प्रकरणी दिले आहे. तथापि या कारणाचे समर्थनार्थ त्यांनी कोणताही तपशील त्यांच्या आदेशामध्ये नमूद केला नाही.

तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर निर्णय देण्याकरिता तीस दिवस इतका कालावधी उपलब्ध होता व त्याप्रमाणे त्यांनी तीसाव्या दिवशी अपिलार्थीस त्यांचा निर्णय कळविला आहे.

तथापि या तीस दिवसाची मुदत संपण्याच्या आतच अपिलार्थी यांनी तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांच्या कडे प्रथम अपिल दिनांक- ०८-०३-२००६ रोजी केले आहे.

अपिलार्थीच्या सदर अपिलावर कार्यकारी अभियंता यांनी कोणतीही सुनावणी न घेता त्यांच्याकडे दिनांक-२२-०३-२००६ रोजीच्या पत्रा अन्वये अपिलार्थीस आपला निर्णय कळविला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी अपिलार्थीस त्यांचे अपिल परत केलेले आहे. अपिल निर्णयामध्ये त्यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला नाही. अपिलार्थीचे या अपिल अर्जावर निर्णय देतांना अपिलार्थीने सदर अपिल महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ मधील कलम ७ (१) खालील विहित केलेले नमूद केले असल्यामूळे व मुदतबाहय अपिल केले असल्यामूळे या अपिलावर जनअपिलिय अधिकारी यांनी कोणताही ठोस निर्णय दिला नसल्याचे दिसून येते. जनअपिलिय अधिकारी यांचेकडून अपिल ठरविण्याची ही पध्दत बरोबर नसून त्यांनी दोन्हीही पक्षकारांस बोलावून घेवून त्यांचे म्हणणे ऐकून घेवून ठोस निर्णय अपिल ठरवितांना देणे आवश्यक असते. तथापि त्यांनी याची कोणतीही पूर्तता केली नसल्याचे दिसून येते. तव्दतच अपिलार्थीने महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अपिल केले आहे. अपिलार्थीने वापरलेल्या अपिलपत्राच्या नमुन्यावरुन त्यांनी हा निष्कर्ष काढल्याचे दिसून येते, त्यांची ही कृती बरोबर नाही. तद्नंतर अपिलार्थीने अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक- १८-०४-२००६ रोजी परत अपिल करुन आपली मुळ माहितीच्या अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता जनअपिलिय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील पत्र क्रमांक- ३४००, दिनांक- २४ एप्रिल, २००६ रोजी कार्यकारी अभियंता , सार्वजनिक बांधकाम विभाग यांना अपिलार्थीस चार दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचीत केले आहे.

तथापि तद्नंतर बराच कालावधी उलटून गेल्यानंतर अपिलार्थीस माहिती न मिळाल्यामूळे अपिलार्थीने व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०४-०७-२००६ रोजी व्दितीय अपिल केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्यास मूळ जनमाहिती अधिकारी व तद्नंतरचे जनमाहिती अधिकारी या दोन्हीहि स्तरावरील जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विलंब लागल्याचे दिसून येते. या विलंबाची कारणे दोन्हीहि जनमाहिती अधिकारी यांना विचारली असता, त्यांनी अपिलार्थीने एकूण सहा वर्षाची माहिती मागविली होती. जुने अभिलेखे शोधण्यात त्यांना उशिर लागला. अशा प्रकारची माहिती त्यांच्याक्डे सहजगत्या उपलब्ध नव्हती व ही माहिती  ही संबंधित उपविभागाची त्या उपविभागाच्या कॅशबूक (रोखवही पुस्तिका) शोधण्यास व गणीतीय आकडेमोड करण्यास उशिर झाला, ही कारणे आयोगासमोर सांगितली. त्यांच्या म्हणण्यात जरी थोडा तंथ्याश असलातरी त्यांनी ही  अपिलार्थीच्या अर्जाची वेळेतच गांर्भीयपूर्वक घेतली असती तर अपिलार्थीस ते विहित मुदतीत कदाचित माहिती पुरवू शकले असते. आता अपिलार्थीस दिनांक- २१-०५-२००७ रोजी सदर माहिती संपूर्णतः विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आली आहे, असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस अपेक्षित असलेली सर्व माहिती त्यामध्ये सर्वसाधारणतः समाविष्ट असल्याचे दिसून येते. या प्रकरणी जनअपिलिय अधिकारी यांनी समन्वयक म्हणून जी

कर्तव्ये पार पाडावयाची होती, ती नीटपणे पाडल्याचे दिसून येत नाही. याची नोंद सचिव (सा.बां.) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी.

अपिलार्थीने आज दिनांक- ०२-०६-२००७ रोजी सुनावणीमध्ये सदर माहिती त्यांना दिनांक २१-०५-२००७ प्राप्त झाली असल्याचे कबुल केले आहे. अपिलार्थीस आता त्यांना अपेक्षित असलेली माहिती मिळालेली असल्यामूळे, अपिलार्थीने मागितलेली माहितीचे स्वरुप,व्याप्ती व ती एकत्रीत करण्याकरिता लागलेला कालावधी पहाता, येथून पुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीना अनुसरुन ज्या-ज्या वेळी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या संदर्भात अर्ज प्राप्त होतील त्या-त्या वेळी विहीत मुदतीत कार्यवाही करावी. अशी दोन्ही जनमाहिती अधिका-यांना समज देवून, अपिल निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीना अनुसरुन ज्या-ज्या वेळी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या संदर्भात अर्ज प्राप्त होतील त्या-त्या वेळी विहीत मुदतीत कार्यवाही करावी. अशी समज जनमाहिती अधिकारी यांना देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०२ जून,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ अपिलार्थी, श्री.कमलाकर जनार्धन पाटील, राहणार- हसेगाव (केज) ता.कळंब जिल्हा- उस्मानाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,

उस्मानाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई-३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५. सचिव (सा.बां.) मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत, यांना वरील प्रमाणे अभिप्रायाची नोंद घेण्या करिता.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३३४

निर्णय दिनांक ०२-०६-२००७

सौ. सुवर्णमाला गणेशराव काळे, : अपीलार्थी
मु. पो. येहळेगाव तालुका कळमनुरी, जिल्हा
हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा तहसीलदार कळमनुरी जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली

जिल्हा हिंगोली

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी सौ. सुवर्णमाला गणेशराव काळे यांच्या वतीने श्री. गणेशराव गंगाराम काळे, (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार कळमनुरी जिल्हा हिंगोली श्री. बी. डी. फुपाटे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली जिल्हा हिंगोली श्री. प्रकाश पिरतवाड (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०७-२००६ रोजी खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> ‘‘०१ जानेवारी २००६ पासून ते १०-०७-२००६ पर्यत साखर रेशन कार्डा वर किती वाटप दरमहा झाली त्याची माहिती, साखर प्रति युनिट किती ग्रॅम व तालुक्यातील किती किरकोळ विक्रीवाल्या दुकानदारास दिले व ठोक विक्रेते किती आहेत, प्रत्येकी दुकानदारास त्याचा दर किलो प्रमाणे किती आहे वाटप झालेली माहिती देण्यात यावी. ०२ जुलै पासून २००६ या महिन्यात केरोसीन अर्ध घाऊक विक्रेते व किरकोळ विक्रेते टॅकर क्रमांक त्यासोबत अधिकारी कर्मचारी कोण आहेत

त्याचा साठा किती याची माहिती त्वरीत द्यावी. या महिन्यात घाऊक वितरण व कार्डधारकांना माल दर किती याची माहिती. घोडा येथील शालेय पोषण आहार कोणत्या किरकोळ विक्रेत्यास जून महिन्याचा दिला त्याचे वाटप झाले किंवा नाही सोबत मुख्याध्यापकाचे पत्र आहे.''

अपीलार्थीच्या वरील मागणीचे अवलोकन करता अपीलार्थीस नक्की कोणती माहिती हवी आहे याचा स्पष्टपणे बोध होत नाही तथापि सर्वसाधारणतः अपीलार्थीस ०१ जानेवारी २००६ ते १०-०७-२००६ या कालावधीतील रेशन कार्डावर झालेल्या साखरेच्या वाटपाचा तपशील, प्रती युनिट किती साखर देय आहे व किती साखरेचे वाटप केले, साखरेचा दर किती हा तपशील हवा असल्याचे दिसून येते. याच बरोबर ०२ जुलै २००६ पासून ते अपीलार्थीने अर्ज केलेल्या दिनांकापर्यत केरोसीन अर्धघाऊक विक्रेते व किरकोळ विक्रेते यांच्या कडील साठ्या संदर्भात व त्यांनी केलेल्या विक्रीसंदर्भात अपीलार्थीस माहिती हवी असल्याचे दिसून येते.

अपीलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाबरोबर घोडा येथील शालेय पोषण आहार संदर्भात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा घोडा मुख्याध्यापक यांचे पत्र जोडले असून या पत्रामध्ये मुख्याध्यापकाने विविध कार्यकारी सहकारी सोसायटी घोडा यांच्याकडे शालेय पोषण आहार मिळण्या संदर्भातील अर्जाची प्रत जोडली आहे. या पत्रावरुन शाळा सुरु होऊन बरेच दिवस होऊनही विविध कार्यकारी सहकारी सोसायटी मौजे घोडा यांनी सदर शाळेच्या शालेय पोषण आहाराचे वितरण जुलै २००६ च्या पहिल्या आठवड्यापर्यत केले नसल्याचे दिसून येते.

अपीलार्थी यांच्या वरील अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक ११-०८-२००६ रोजी माहिती पुरविली आहे.जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस पुरविलेली माहिती पाहता त्यामध्ये त्यांनी वर उल्लेख केलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळाच्या मुख्याध्यापकाच्या अर्जा संदर्भात केलेल्या कारवाईचा उल्लेख नाही. सदर मुद्यावर

गट शिक्षण अधिका-याकडून कार्यवाही अपेक्षित असल्याचे अपिलीय अधिकरी यांनी सांगितले तथापि सदर अर्ज गट शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविला किंवा कसे याबाबत त्यांना प्रश्न विचारला असता सदर अर्ज त्यांनी गट शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविला नाही व सदर प्रश्न सोडविण्यास काही मदत केली का ? असे पुढे विचारले असता त्यावर त्यांनी नकारार्थी उत्तर दिले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती बरोबर नाही, माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्या नंतर जास्तीत जास्त पाच दिवसांचे आत या अर्जाची प्रत त्यांनी संबंधित प्राधिकरणाकडे पाठवावयास हवी होती असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

वरील माहितीने समाधान न झाल्याने अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अन्वये दिनांक २२-०९-२००६ रोजी प्रथम जन अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी हिंगोली यांचेकडे प्रथम अपील केले आहे त्यामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी १ महिना ५ दिवस इतक्या विलंबाने माहिती दिल्याने त्यांच्यावर शास्ती लावण्याबाबत जन अपीलीय अधिकारी यांचेकडे विनंती केली आहे.

अपीलार्थी यांच्या या प्रथम अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १६-१०-२००६ रोजी सुनावणी घेऊन अपीलार्थीचे अपील नामंजूर केल्याचे अपीलार्थीस दिनांक २०-१०-२००६ रोजी कळविले. जन अपीलीय अधिकारी यांच्या या निर्णयावर व्यथित होऊन अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलाचे कारण म्हणजे जन अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी हिंगोली यांनी तहसीलदार कळमनुरी यांना दंड लावला नाही व जन अपीलीय अधिका-याने संबंधित अधिका-याला पाठीशी घातले आहे व मुदतीत माहिती दिली नाही असे दिले आहे. त्याच बरोबर त्यांनी या अपीलामध्ये त्यांच्या मूळ माहितीच्या मागणीची पुनरावत्ती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला आहे की त्यांनी अपीलार्थीस दिनांक ११-०८-२००६ रोजी, त्यांना आवश्यक असलेली सर्व माहिती पुरविली आहे व त्या पुष्ट्यर्थ त्यांनी अपीलार्थीस दिलेली माहिती आणि जी कागदपत्रे आयोगास सादर केली आहे त्याचे अवलोकन करता सर्वसाधारणपणे अपीलार्थीस हवी असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहित तरतुदीनुसार अपिलार्थीस पुरविल्याचे दिसते. तथापि सदर माहितीतील साखर विषयक माहिती सोडून उर्वरीत माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलार्थी यांनी सुनावणी मध्ये आज कबूल केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे साखरेविषयक माहिती आज रोजी उपलब्ध असल्याचे त्यांनी आयोगास सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली व अपीलार्थीने विचारलेली साखरेच्या साठ्याबाबतची, उपरोक्त कालावधी तील सर्व माहिती ३ दिवसाच्या आत विनामूल्य व स्वाक्षांकित करुन अपीलार्थीस द्यावी. अपीलार्थीने त्यांच्या आयोगाकडे केलेल्या अपीलातील जन अपीलीय अधिकारी हे तहसीलदार कळमनुरी यांना पाठीशी घालत आहे हे आरोप त्यांनी जन अपीलीय अधिकारी यांनी तहसीलदार कळमनुरी यांना शास्ती न लावल्यामुळे केले असावेत असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली असल्यामुळे व जन अपीलीय अधिकारी यांना जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लादण्याचा कोणताही अधिकार नसल्यामुळे जन अपीलीय अधिकारी यानी या मुद्या संदर्भात कोणतीही कारवाई केली नाही त्यांची ही कृती बरोबर आहे.

वरील विवेचनासह अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, साखरेच्या साठ्याबाबतची अपिलार्थीने विनंती केलेल्या कालावधीतील सर्व माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत विनामूल्य व स्वाक्षांकित करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२ जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ सौ. सुवर्णमाला गणेशराव काळे, मु. पो. येहळेगाव तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार कळमनुरी जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, हिंगोली जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३४४/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ०२-०७-,२००७

१. श्री.तुळजाराम एकनाथ फुलारी .. अपिलार्थी.
सम्राट चौक, श्रीकृष्ण नगर, लातूर
तालूका जिल्हा- लातूर.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, लातूर.

२. जनअपिलीय अधिकारी तथा ..
विभागीय निबंधक,
सहकारी संस्था,
लातूर.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक- ०२-०७-२००७ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री. तुळजाराम एकनाथ फुलारी, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, लातूर, श्री.राजेश लव्हेकर, ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जनअपिलीय अधिकारी तथा विभागीय

सहनिबंधक, लातूर, श्री.बी.टी.बधान, ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी तथा असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक- २५-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील माहितीची मागणी केली होती.

"१) सहाय्यक निबंधक यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक जा.क्र. नियंत्रण/ लोकशाहीदिन/ स्नेहप्रभागृनि/ लातूर, दिनांक- २५ ऑक्टोंबर, २००५ रोजीच्या पत्रातील पृष्ट क्रमांक आठ वर त्यांनी स्नेहप्रभा सह.गृ.नि. संस्थेच्या निवडणूकीच्या नोटीशीची प्रत व प्रोसिडिंगची प्रत उपनिबंधकाकडे दाखल केल्याचे लिहिले आहे. त्या प्रोसिडिंग व निवडणूक नोटीशीची प्रत.

२) मा.सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र १७ मे २००६ च्या निर्देशा प्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा Progress- Report

३) डॉ.सुग्रीव काळे यांनी जिल्हा उपनिबंधक सह.संस्था,लातूर यांना लिहिलेल्या दिनांक- २६-०५-२००६ च्या विनंती पत्राची Action Taken Report व Progress Report."

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती व सदर माहितीचा कालावधी दिनांक- २४-०९-२००३ ते २४-०९-२००६ असा दर्शविला होता. अपिलार्थीच्या वरील अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २६-१०-२००६ रोजीच्या पत्रामध्ये, "आपणास सदर माहिती

वेळेवर दिली आहे व दिनांक- ०९-०३-२००४ रोजीच्या विशेष सभेतील इतिवृत्ताच्या संदर्भात सभेची नोटीसची प्रत स्वाक्षांकित करुन मागितली आहे. परंतू संबंधीत संस्थेचे मूळ रेकार्ड उपलब्ध नसल्यामूळे सदरील कागदपत्रे स्वाक्षांकित करुन देता येत नाही." असे कळविले.

जनमाहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २२-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २९-११-२००६ रोजी सुनावणी घेतली. त्यांचेकडील आदेश दिनांक- १०-०१-२००७ अन्वये सुनावणीचे आदेश पारीत केले. या आदेशामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मुळमाहितीच्या अर्जात नमूद केलेली माहिती स्वाक्षांकित करुन त्यास तात्काळ द्यावी, असे सूचीत केले व अपिलार्थी यांना जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे दप्तर पहाणीसाठी अर्ज करुन दप्तर पहाण्याचे व या पहाणीतून त्यांना आवश्यक असलेली माहितीची कागदपत्रे प्राप्त करुन घ्यावीत, असे अपिलार्थीस सुचविले. जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- १२-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस, त्यांच्या कार्यालयात हजर राहाण्याचे सूचीत केले व त्याचबरोबर अपिलार्थीस ते जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर झाल्यानंतर स्वाक्षांकित माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे. तथापि तद्नंतर अपिलार्थी हे जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. परतु अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेलो असतांना त्यांना अयोग्य वागणूक देण्यात आली व संबंधीत कर्मचा-यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केली.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी त्यांना ही माहिती रजिष्टर पोष्टाने हवी असल्याचे प्रथम अर्जातच  स्पष्ट केले आहे. तथापि त्यांनी स्पष्ट विनंती केल्याप्रमाणे व त्याचबरोबर जनअपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे ही माहिती अपिलार्थीस रजिष्टरपोष्टाने न पाठविता त्यांना कार्यालयात  भेटावयास बोलाविणे, ही जनमाहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे.

याच बरोबर या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने केलेल्या कार्यवाहीचा पुरावा त्यांच्याकडे मागीतला असता त्यांनी त्यांच्याकडे पुरावा उपलब्ध नसल्याचे सांगितले. या वरुन या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी काहीही कार्यवाही केलेली नसल्याचे दिसून येते. त्यांचे हे वर्तन त्यांच्यातील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करते. सबब या प्रकरणी असे आदेशित करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या या कर्तव्य परायणतेच्या  अभावा बद्दल त्यांच्यावर सचिव, सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीस अनुसरुन योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करुन आयोगास आपला अहवाल दोन महिन्याच्या आत सादर करावा व जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना स्पष्ट स्वरुपात, स्वाक्षांकित करुन हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर सात दिवसाच्या आत विनामुल्य व रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन द्यावी. वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर सदर अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१.	अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती, स्पष्ट स्वरुपात, स्वाक्षांकित करुन हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत त्यांना विनामुल्य व रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन द्यावी.

३.	जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या या कर्तव्य परायणतेच्या अभावा बद्दल सचिव, सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीस अनुसरुन त्यांच्यावर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करुन आयोगास आपला अहवाल दोन महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद.
दिनांक- ०२ -०७- २००७.

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१	श्री.तुळजाराम एकनाथ फुलारी, सम्राटचौक, श्रीकृष्ण नगर, लातूर. तालूका व जिल्हा- लातूर
२	जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक,सहकारी संस्था,लातूर यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
३	जनअपिलीय अधिकारी तथा, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
४	सचिव, सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यात येते.
५	सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.
६	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/३३५/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ०४ जून, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | साठे राजाभाऊ बाबासाहेब,<br>मु.पो.वडगाव (दा)<br>तालूका-परळीवैजनाथ<br>जिल्हा-बीड-४३१५१५ | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जनमाहिती अधिकारी तथा<br>प्राध्यापिका, कै.लक्ष्मीबाई देशमुख<br>महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ<br>जिल्हा-बीड. | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलिय अधिकारी तथा<br>प्राचार्य,<br>कै.लक्ष्मीबाई देशमुख<br>महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ<br>जिल्हा-बीड. | .. | |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०४ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी साठे राजाभाऊ बाबासाहेब,(येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) व जनमाहिती अधिकारी तथा प्राध्यापिका, कै.लक्ष्मीबाई देशमुख, महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा-बीड,श्रीमती विद्या व्यंकटराव देशपांडे (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन

अपिलिय अधिकारी तथा प्राचार्य, कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा-बीड, श्रीमती.आर.जे.परळीकर ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी या संबोधण्यात येईल ) हजर आहेत.

अपिलाच्या सुनावणीच्या सुरुवातीसच जनअपिलिय अधिकारी यांनी आयोगा पुढे एक लेखी शपथपत्र सादर केले असून त्या शपथपत्रामध्ये अपिलार्थीने जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये केलेल्या अपिलाच्या निर्णयाचा तपशील आहे. सदर शपथपत्राचे अवलोकन केले असता जनअपिलिय अधिकारी यांनी अपिलार्थीने दाखल केलेले प्रथम अपिल ते बनावट व अपरिपक्व असल्यामूळे फेटाळण्यात आले असल्याचा निर्णय दिनांक- २७-११-२००६ रोजी दिला आहे. जनअपिलिय अधिकारी यांनी हा निर्णय ज्या कागद पत्रांच्या आधारावर घेतला, त्या कागदपत्रांची व सुनावणी आदेशाची पहाणी करता, सुनावणीसाठी जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे संबंधित अपिलार्थी उपस्थित राहिले आहेत व त्यांनी संबंधित अपिलावर त्यांची स्वाक्षरी नसून अपिलावरचा तपशिल त्यांच्या हस्ताक्षरात नाही, असे शपथपत्रावर लिहून दिले आहे व अपिलार्थीचे ते शपथपत्र आयोगा समोर सादर केले आहे.

अपिलार्थीचा मूळ माहितीचा अर्ज हा अपिलार्थी यांनी केलेला नसून तो दुस-या कोणत्या तरी व्यक्तीने अपिलार्थी यांच्या नावाने केला असल्यामूळे तो बनावट ठरतो. सदर अपिल अर्ज बनावट असल्याचे जनअपिलिय अधिकारी यांच्या निदर्शनास आल्यामूळे ,जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- २७-११-२००६ रोजी अपिलार्थीचे प्रथम अपिल फेटाळले आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ३१-०१-२००७ रोजी व्दितीय अपिल केले असून या अपिला सोबत त्यांनी प्रथम अपिलाचा निर्णय कळविलेला नाही व आज सुनावणीस त्यांनी सादर केलेले शपथपत्र पहाता,

त्यांची सही कोणत्यातरी अनोळखी व्यक्तिने केली असल्याचे त्यांनी या शपथपत्रावर लिहून दिले आहे. या पार्श्वभूमीवर जनअपिलिय अधिकारी यांनी दिलेला निर्णय बदलण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही व अपिलार्थीचे व्दितीय अपिल खारीज करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

**निर्णय**

३. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ०४ जून,२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**
प्रति,

१ साठे राजाभाऊ बाबासाहेब, मु.पो.वडगांव (दा) तालूका- परळीवैजनाथ, जिल्हा-बीड.

२ जनमाहिती अधिकारी तथा कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा- बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा प्राचार्य, कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळीवैजनाथ, जिल्हा-बीड,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०९

निर्णय दिनांक ०५-०६-२००७

श्री. विनायक शामराव काळे, : अपीलार्थी
माया कलेक्शन जवळ, जुना भावसिंगपुरा,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापिका श्री संत विश्रामबाबा
विद्यालय भावसिंगपुरा (भिमनगर), नंदनवन
कॉलनी, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (मा.) जिल्हा परिषद
औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक ०४-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी यांच्या वतीने ॲडव्होकेट एस. बी. गस्तगार, (येथून पुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका संत विश्रामबाबा विद्यालय नंदनवन कॉलनी, औरंगाबाद यांचे वतीने ॲडव्होकेट श्री. एस. एस. शेटे (येथून पुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन

अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.) जिल्हा परिषद औरंगाबाद श्री. एम. ए. खलीक (येथून पुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

अपीलार्थी श्री. विनायक शामराव काळे यांनी दिनांक १७-०७-२००६ च्या अर्जाव्दारे मुख्यध्यापिका व जन माहिती अधिकारी संत विश्रामबाबा विद्यालय नंदनवन कॉलनी औरंगाबाद यांच्याकडे खालील प्रमाणे ७ मुद्याची माहिती मागितली होती.

"१. श्री. संत विश्रामबाबा विद्यालय भावसिंगपुरा या शाळेच्या सन १९९२ ते शैक्षणिक वर्ष २००५-०६ पर्यतच्या संच मान्यतेच्या प्रमाणित प्रती.

२. शाळेत कार्यरत असणा-या सर्व कर्मचा-यांना संस्थेने दिलेल्या नियुक्ती आदेशाच्या प्रमाणित प्रती.

३. शैक्षणिक वर्ष १९९२ ते शैक्षणिक वर्ष २००६-०७ पर्यत कार्यरत असणा-या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून देण्यात आलेल्या वैयक्तिक मान्यता व सेवासातत्याच्या सर्व प्रमाणित प्रती.

४. श्री संत विश्रामबाबा विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची सेवा जेष्ठता (बीसीएल प्रमाणित) यादीची प्रमाणित पत.

५. प्रभारी मुख्याध्यापिका श्रीमती शिल्पा दादाराव जिवरग यांना जिल्हा परिषद शिक्षण विभाग (माध्य.) यांनी मुख्याध्यापक पदास दिलेल्या वैयक्तिक मान्यतेची प्रमाणित प्रत.

६. सन १९९२ ते जुलै २००६ पर्यतच्या शिक्षक हजेरी पुस्तकाच्या सर्व प्रमाणित प्रती.

७. जून १९९२ ते शैक्षणिक वर्ष २००५ पर्यतच्या जिल्हा परिषद शिक्षण विभागाने तपासणी केलेल्या शाळा तपासणी अहवालाच्या सर्व प्रमाणित प्रती."

सदर माहिती विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी न दिल्यामुळे अपीलार्थी यांनी जन अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २३-०८-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी त्यांच्या दिनांक १६-०९-२००६ च्या पत्राव्दारे शासन पत्र दिनांक २८-१०-२००५ व शिक्षण उप संचालक औरंगाबाद यांचे दिनांक ३०-०१-२००६ चे पत्राचा संदर्भ देऊन संत विश्रामबाबा विद्यालयाच्या मुख्यध्यापिका या जन माहिती अधिकारी व त्या संस्थेचे सचिव हे जन अपीलीय अधिकारी असल्याचे सांगून ते अपील संस्थेच्या सचिवाकडे पाठविले व संस्थेकडे संपर्क साधण्यास अपिलार्थी यांना कळविले.

दिनांक ०२-०१-२००७ रोजी अपीलार्थी यांनी जन अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपीलावर कोणताही आदेश पारीत केला नसल्यामुळे तसेच त्यांना अद्यापही माहिती मिळाली नसल्याचे कारणावरुन व्दितीय अपील आयोगासमोर सादर केले आहे. अपीलामध्ये त्यांनी खालील मुख्य मुद्दे उपस्थित केले आहेत.

१. मुख्याध्यापिका या माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये जन माहिती अधिकारी असल्याचे व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद हे जन अपीलीय अधिकारी असल्यामुळे त्यांच्याकडे या कायद्याच्या कलम १९ (१) खाली प्रथम अपील दाखल केले होते.

२. अपीलार्थी यांनी शाळेतील कर्मचा-याच्या नेमणुका संदर्भातील माहिती मागितली होती व ती पोस्टाने देण्याविषयी विनंती केली होती. त्यांनी अर्ज केल्यापासून जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आतापर्यंत काहीही कळविण्यात आलेले नाही.

३. माहिती अधिका-याने एक तर त्यांची विनंती मान्य करायला पाहिजे होती किंवा अर्ज नाकारणे आवश्यक होते तथापि वारंवार समक्ष भेटूनही त्यांना

अद्यापपर्यंत मागितलेल्या माहिती संदर्भात काहीही कळविण्यात आलेले नाही. म्हणून त्यांनी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले होते तथापि जन अपीलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केले नाहीत वा माहिती दिली नाही.

४. जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल केल्यानंतर, जन अपीलीय अधिकारी यांनी सदर अपील दिनांक १६-०९-२००६ च्या पत्रासोबत मुख्याध्यापिका श्री संत विश्रामबाबा विद्यालय नंदनवन कॉलनी औरंगाबाद यांचेकडे पाठवून अर्जदारास माहिती द्यावी व सोबतचे अपील संस्थेच्या सचिवा कडे पोहोचविण्याबद्दल कळविले. सदर पत्र हे शासन पत्र दिनांक २८-१०-२००५ व शिक्षण उपसंचालक औरंगाबाद यांचे पत्र दिनांक ३०-०१-२००६ चा संदर्भ देऊन अपीलार्थीस पाठविले व मुख्याध्यापक यांनी माहिती न दिल्याने त्याविरुध्दचे अपील हे संस्थेचे सचिव यांच्याकडे करणे आवश्यक असून त्यांच्याकडे संपर्क साधावा असे कळविले. त्यानुसार दिनांक २३-०९-२००६ रोजी मुख्याध्यापिका यांनी अपीलार्थीस संस्थेचे सचिवाकडे संपर्क साधण्या बद्दल कळविले. त्यानंतर दिनांक ०७-१०-२००६ रोजी मुख्याध्यापिका यांनी अपीलार्थीने त्यांना १६००/- रुपये माहिती संदर्भात फी म्हणून जमा करण्याबद्दल व माहिती घेऊन जाण्या बद्दल कळविले.

५. अपीलार्थी यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्या कडे अपील केले होते व जन अपीलीय अधिकारी यांना अपील इतराकडे हस्तांतरीत करण्याचे अधिकार नसल्यामुळे एक तर त्यांनी अपील फेटाळणे अथवा मंजूर करणे आवश्यक होते असे नमूद केले आहे.दरम्यान अपीलार्थीनी मुख्याध्यापिका यांना कळविले की त्यांचे प्रथम अपील जन अपीलीय अधिकारी

(शिक्षणाधिकारी) यांच्याकडे प्रलंबीत असल्यामुळे त्यांना पैसे भरण्याची आवश्यकता नाही. त्याचप्रमाणे अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या समोरील अपीलावर निर्णय दिलेला नाही व अपील हस्तांतरणासाठी त्यांनी योग्य ती पध्दत पाळलेली नाही, तसेच सदर अपील निकाली काढलेले नाही. जन अपीलीय अधिका-यांच्या या कृतीने व्यथित होऊन अपीलार्थी यांनी प्रस्तुत व्दितीय अपील माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) खाली दाखल केलेले आहे व त्यांचे अपील मान्य करुन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांना त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबद्दल आदेश द्यावेत तसेच जन अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची व दंडात्मक कारवाई करावी अशी विनंती केली आहे.

दिनांक ०४-०६-२००७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी यांचे वतीने त्यांचे वकील ॲडव्होकेट श्री. एस. बी. गस्तगार यांनी अपीलार्थी यांना अद्याप माहिती मिळाली नसल्याचे सांगितले तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद हे जन अपीलीय अधिकारी असतांना त्यांनी माहिती देण्याचे टाळले असे सांगितले. जन माहिती अधिका-याच्या वतीने ॲडव्होकेट श्री. एस. एस. शेटे यांनी सांगितले की, अपीलार्थी यांनी मुलतः त्यांच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात केलेले प्रथम अपील हे चुकीच्या प्राधिकरणाकडे (शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद ) केले होते ते त्यांनी योग्य त्या प्राधिकरणाकडे पाठविले व त्यासाठी त्यांच्याकडे संपर्क साधण्यास सांगितले होते तसेच मुख्याध्यापिका यांनी अपिलार्थी यांना दिनांक ३१-०७-२००६ च्या पत्राव्दारे संस्थेने श्री. नितीन जिवरग यांची माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली असून माहितीच्या संदर्भात त्यांच्याकडे संपर्क साधावा असे कळविले होते तथापि या पत्राबाबत अपीलार्थी यांनी त्यांचे

युक्तीवादामध्ये कोणताही उल्लेख केलेला नाही. सदर पत्र मिळूनही अपीलार्थी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधला नाही व जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपीलावर विहित मुदतीत निर्णय न दिल्या मुळे व्दितीय अपील आयोगासमोर दाखल केल्याचे प्रतिपादन केले आहे.

या प्रकरणी संस्थेने नियुक्त केलेले श्री. नितीन जिवरग हे जन माहिती अधिकारी होऊ शकतात काय ? तसेच या प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी कोण आहेत यासंबंधी खुलासा करण्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांना सांगितले असता त्यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार शाळेच्या मुख्याध्यापिका या जन माहिती अधिकारी तर संस्थेचे सचिव हे जन अपीलीय अधिकारी असतील असे सांगितले तथापि संस्थेने नियुक्त केलेल्या श्री. नितीन जिवरग यांचे जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती योग्य आहे किंवा कसे यासंबंधी अभिप्राय देण्यासाठी खुलासा करण्यास वेळ देण्याची विनंती केली. त्यांना दिनांक ०५-०६-२००७ रोजी सदर खुलासा शपथपत्रावर सादर करण्याचे सुचित करण्यात आले. त्याच प्रमाणे संस्थेने श्री. नितीन जिवरग यांची नेमणूक संस्थेच्या ज्या ठरावा आधारे केली त्या ठरावाची प्रत तसेच जारी केलेल्या आदेशाच्या प्रती दिनांक ०५-०६-२००७ रोजी सादर करण्याचे संस्थेस सांगण्यात आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी आज दिनांक ०५-०६-२००७ रोजी शपथपत्र दाखल केले. सदर शपथपत्रामध्ये त्यांनी शासनाच्या आदेशानुसार संस्थेने जन माहिती अधिकारी म्हणून मुख्याध्यापक व जन अपीलीय अधिकारी म्हणून संस्थेचे सचिवांची नियुक्ती करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करुन, त्यानुसार नियुक्त्या न केल्यास संस्था जबाबदार राहतील असे नमूद केले आहे. त्यांनी सोबत शासन पत्र दिनांक २८-१०-२००५, शिक्षण संचालक (प्राथ.) पुणे यांचे पत्र दिनांक १८-०१-२००६ व शिक्षण उप संचालक औरंगाबाद यांचे दिनांक ३०-०१-२००६ चे पत्राच्या प्रती जोडल्या आहेत. शासन

पत्र दिनांक २८-१०-२००५ अन्वये संचालक शिक्षण संचालनालय यांना शैक्षणिक संस्थामधून जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्या नियुक्त्या करण्याबाबत आदेश निर्गमित करणेबाबत सूचना दिल्या होत्या. संचालकांनी त्यांच्या दिनांक १८-०१-२००६ च्या पत्राव्दारे सर्व शिक्षणाधिकारी व उपसंचालकांना, प्रत्येक संस्थेत मुख्याध्यापक जन माहिती अधिकारी व संस्थेचे सचिव यांना जन अपीलीय अधिकारी म्हणून नियुक्त करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे. केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये जन माहिती अधिकारी म्हणून कोणास नेमावे याबाबत निश्चित उल्लेख नसला तरी संबंधित प्राधिकारणामध्ये ज्यांचेकडे अभिलेखे असतात असे अधिकारी यांना जन माहिती अधिकारी व त्यांचेपेक्षा वरिष्ठ अधिकारी यांना जन अपीलीय अधिकारी म्हणून नेमणे अपेक्षित आहे. या प्रकरणी खाजगी शिक्षण संस्था या शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे व त्यांनी सर्व शिक्षण संस्थामध्ये एकसुत्रीपणा असण्यासाठी अशा सूचना दिल्या असल्याचे दिसते. सदर आदेश शिक्षण संस्थावर बंधनकारक आहेत.

संस्थेने श्री. नितीन जिवरग संस्थेचे कार्यकारिणी सदस्य यांची जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक करण्यासाठी संस्थेने दिनांक ३०-०७-२००६ रोजी मंजूर केलेल्या ठराव क्रमांक २ ची प्रत दिनांक ०५-०६-२००७ रोजी सादर केली. समक्ष सुनावणीचे वेळी मुख्याध्यापिका रजेवर असतांनाचे कालावधीत श्री. जिवरग यांची माहिती अधिकारी म्हणून संस्थेने नियुक्ती केली होती असे सांगण्यात आले. श्री. जिवरग हे जरी संस्थेच्या कार्यकारिणी सदस्य असले तरी ते संस्थेचे प्राधिकारी होऊ शकत नाही.त्यावेळी संस्थेने प्रभारी मुख्याध्यापक यांची तात्पुरत्या स्वरुपात जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती करणे आवश्यक होते. महाराष्ट्र खाजगी शाळामधील कर्मचा-यांच्या सेवाशर्ती नियमा नुसार, मुख्याध्यापक, सचिव व अध्यक्ष यांना असलेले अधिकार कार्यकारिणी सदस्यांना असू शकत नाहीत व त्यामुळे

कार्यकारिणी सदस्यांची जन माहिती अधिकारी म्हणून संस्थेने केलेली नियुक्ती अयोग्य असल्याचे आयोगाचे मत आहे.

या प्रकरणातील सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता, व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांचे मत लक्षात घेता, अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी कळविलेल्या जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे संपर्क साधणे आवश्यक होते. त्यांनी स्वतः हून निष्कर्ष काढून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद हे जन अपीलीय अधिकारी आहेत व त्यांनी निर्णय देणे आवश्यक आहे असे जे म्हटले आहे ते चूक असून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी, शासन आदेशानुसार या प्रकरणी असलेले जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील पाठविले होते,त्याचा विहित मुदतीत निर्णय लागण्यापुर्वीच व्दितीय अपील करणे व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांना अपील दुस-या अपीलीय अधिका-याकडे पाठविण्याचा अधिकार नाही असे म्हणणे चूक आहे. त्याच प्रमाणे अपीलार्थी यांनी प्रथम अपील योग्य त्या प्राधिकरणाकडे दिल्या नंतर त्यांच्या निर्णयाची प्रतिक्षा करणे आवश्यक होते. या परिस्थितीत अपीलार्थी यांचे आयोगासमोर प्रस्तुत दुसरे अपील हे मान्य करता येणार नाही. त्यांनी प्रथम जन अपीलीय अधिकारी यांच्या कडे अपील करुन त्या निर्णयाची विहित मुदत संपेपर्यत वाट पाहणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत छत्रपती श्री शाहू टेक्नीकल इस्टिट्यूट ॲण्ड कॉलेज औरंगाबाद संस्थेचे सचिव यांना आदेशित करण्यात येते की त्यांनी शासन आदेशानुसार मुख्याध्यापक व संस्थेचे सचिव यांच्या अनुक्रमे जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी म्हणून नियुक्त्या कराव्यात. व सचिवांनी त्यांचेकडे शिक्षणाधिकारी यांचेकडून प्राप्त अपीलार्थीचे प्रथम अपीलावर १५ दिवसाच्या आत निर्णय द्यावा. त्यानंतरही अपीलार्थी यांना माहिती मिळू शकली नाही तर राज्य माहिती आयोगाकडे दाद मागण्याची अपीलार्थीस मुभा राहिल.

**निर्णय**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. जन अपीलीय अधिकारी व सचिव छत्रपती श्री शाहू टेक्नीकल इस्टिट्यूट ॲण्ड कॉलेज औरंगाबाद यांनी अपीलार्थीचे प्रथम अपील माहिति मिळण्याबाबतचे अपील हे आदेश प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसात सुनावणी घेऊन या संदर्भात आपला निर्णय घ्यावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५ जून २००७ राज्य माहिति आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विनायक शामराव काळे, माया कलेक्शन जवळ, जुना भावसिंगपुरा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्यध्यापिका श्री संत विश्रामबाबा विद्यालय भावसिंगपुरा (भिमनगर), नंदनवन कॉलनी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.) जिल्हा परिषद औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपीलीय अधिकारी व सचिव छत्रपती श्री शाहू टेक्नीकल इस्टिट्यूट ॲण्ड कॉलेज औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/३३७/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक ०५ जून, २००७.

१. श्री.पाटील तुकाराम दत्तात्रय .. अपिलार्थी.
मु.जानापूर, पो.शिरोळ,ता.उदगीर
जिल्हा- लातूर.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
नायब तहसीलदार, पुरवठा,
तहसील कार्यालय, उदगीर

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
तहसीलदार,उदगीर.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०५ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री.पाटील तुकाराम दत्तात्रय, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत तर जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,पुरवठा, तहसील कार्यालय, उदगीर, श्री.बी.एस.रक्षाळे, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा तहसीलदार, उदगीर, श्री.डी.के.राठोड ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी या संबोधण्यात येईल ) हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक- ०७-१०-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडून स्वस्त धान्य दुकान, जानापूर, श्री. कालीदास भिमराव बिरादार या स्वस्तधान्य दुकानदाराच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" १) एकुण रेशनकार्ड किती आहेत ? यादी देण्यात यावी.

२) अंत्योदय अन्नपुर्णा, बी.पी.एल. लाभार्थी किती आहेत?

३) धान्य व साखर आणि रॉकेलचा मासीक कोटा किती आहे व पुरवठा किती होतो?

४) दत्तात्रय किसनराव पाटील यांचे रेशनकार्ड आहे काय?

५) त्यांना रेशन व रॉकेल मिळते काय ? "

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती किंवा कसे या बाबत अपिलार्थीने केलेल्या अर्जामध्ये कोणताही उल्लेख केलेला नाही.

अपिलार्थीच्या या माहितीच्या अर्जावर अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र दिनांक- २७-११-२००६ अन्वये सदर माहिती पुरवठा विभागाकडून दिनांक- १६-११-२००७ रोजी प्राप्त करुन घेवून अपिलार्थीस पुरविली आहे.

अपिलार्थीने ज्या दिवशी माहितीच्या मागणीचा अर्ज केला होता त्या दिवसा पासून तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती मिळणे, हे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार अभिप्रेत आहे. तथापि अपिलार्थीस तीस

दिवसाच्या आत माहिती न मिळाल्यामूळे त्यांनी जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १८-११-२००६ रोजी याच माहितीच्या मागणीच्या संदर्भात आपली मूळ मागणी कायम ठेवून जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल केले आहे.

या अपिलावर जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- ११-०१-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सदर सुनावणीस अपिलार्थी हजर राहीले नाहीत. तद्नंतर जनअपिलीय अधिकारी यांनी हे अपिल दिनांक- ०५-०४-२००७ रोजी अंतीम केले. अपिलार्थी यांनी त्यांच्या समोर उपस्थित राहून तोंडी किंवा लेखी म्हणणे सादर केले नसल्यामूळे अपिलार्थीचे अपिल निकाली काढल्याचे या अपिल निर्णयात म्हटले आहे.

मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय न झाल्यामूळे अपिलार्थीने त्यांच्या मूळमाहितीच्या मागणी करिता दिनांक- ०५-०२-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल सादर केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये देखील त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले की, अपिलार्थीस अपेक्षीत असलेली जवळ जवळ सर्व माहिती दिनांक- २७-११-२००६ रोजी पुरविण्यात आलेली आहे. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक- ०८ डिसेंबर, २००६ रोजी प्राप्त झाल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगा समोर सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. अपिलार्थीने त्यास पुरविलेली माहिती चुकीची व खोटी असल्याचे आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलामध्ये म्हटले आहे. सदर माहिती महसूल विभागाच्या उपलब्ध

अभिलेखावरुन दिली असून ती सत्य असल्याचे प्रतिपादन  जनमाहिती अधिकारी व जनअपिलिय अधिकारी यांनी आज शपथपत्राव्दारे केले आहे. सदर माहिती खोटी असल्याबाबत अपिलार्थीने आयोगाकडे कोणताही पुरावा सादर केलेला नाही व त्याच बरोबर अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती पहाता, अपिलार्थीचा मुद्दा क्रमांक-१ यावर अपिलार्थीस माहिती मिळाली नसल्याचे  दिसून येते.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये, पुढे जनमाहिती अधिकारी व जनअपिलिय अधिकारी यांनी तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे वीकलांग असून त्यांनी ही माहिती संबंधीत स्वस्तधान्य दुकानदारांकडून प्राप्त करुन घेतली असल्याचे आयोगा समोर सांगितले. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असतांना सर्वसाधारणपणे ती माहिती अधिका-याने अपिलार्थीस विहित मुदतीत देणे अभिप्रेत आहे. तथापि तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी स्वस्तधान्य दुकानदाराकडून ही माहिती घेण्यासाठी का प्रयत्न करावेत, या प्रश्नाच्या उत्तरा संदर्भात संबंधित जनमाहिती अधिकारी यांना आपले कार्यालयीन अभिलेख्याची व दैनंदिन कर्तव्याची फारशी जाण नसावी, असे अनूमान काढण्यास हरकत नाही. तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे विकलांग असून त्यांच्या या अपंगात्वामूळे त्यांच्या कार्यक्षमतेला काही मर्यादा पडतात, असेहि जनमाहिती अधिकारी व जनअपिलिय अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

दोन्हीहि बाजूचा युक्तीवाद ऐकला असता, आता असेही आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती मुद्या क्रमांक- १ सहित अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत जनमाहिती अधिकारी यांनी विनामूल्य पुरवावी. तव्दतच

तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार विहीत कालावधीत अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिली नाही. या बाबत त्यांना आयोगा तर्फे समज देण्यात येत आहे. याची नोंद जिल्हाधिकारी लातूर यांनी यथायोगरित्या घ्यावी, असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

४. अपील अशंतः मान्य करण्यात येत आहे.

५. अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती, मुद्या क्रमांक-१ सहित, अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत जनमाहिती अधिकारी यांनी विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ०५ जून,२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.पाटील तुकाराम दत्तात्रय, मु.जानापूर, पो.शिरोळ, तालूका-उदगीर, जिल्हा-लातूर

२ जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, पुरवठा, तहसील कार्यालय, उदगीर यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा तहसीलदार,उदगीर,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ जिल्हाधिकारी, लातूर, यांना वरील नोंद घेण्यासाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

## २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३३९

निर्णय दिनांक ०५-०६-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. धोंडीराम हानमंतराव नळेगावे,<br>रा. संगाचीवाडी, पोस्ट शेळगाव तालुका चाकूर<br>जिल्हा लातूर | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा विशेष भुसंपादन अधिकारी,<br>स्वर्णा प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हाधिकारी लातूर | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. धोंडीराम हानमंतराव नळेगावे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा विशेष भुसंपादन अधिकारी, स्वर्णा प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर डॉ. भारत नारायण बस्तेवाड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी लातूर (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे

अनुपस्थित आहेत.  जन अपीलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीची सखेद नोंद आयोगाने घेतली असून येथून पुढे आयोगाच्या सुनावणीसाठी ज्या ज्या वेळी बोलावणे येईल त्या त्या वेळी त्यांना हजर राहण्याच्या सूचना महसूल आयुक्त औरंगाबाद विभाग यांनी द्याव्यात व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत पाठवावा असे त्यांना सुचित करण्यात येते.

या प्रकरणी अपीलार्थीने त्यांचे दिनांक ०३-११-२००६ रोजीच्या अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे संगमवाडी बृ. ल. पा. प्रकल्प तालुका चाकूर जिल्हा लातूर या प्रकल्पाच्या भुसंपादन संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> “ संगमवाडी बृ. ल. पा. प्रकल्प तालुका चाकूर जिल्हा लातूर येथील भुसंपादन प्रक्रियेतील प्रस्तावित प्रक्रियेत संपूर्ण बुडित क्षेत्रात जमीन संपादित एकूण खातेदारांची नाव व पत्ता यादी, त्यांचे संपादित क्षेत्र, धरणग्रस्त प्रमाणपत्र मागणी केलेली दिनांक व धरणग्रस्त प्रमाणपत्र देण्यात आल्याची दिनांक नोंद करुन संगणक प्रिंटची प्रमाणित प्रत २ प्रतीत तातडीने मिळणे बाबत”

अपीलार्थीने सदर माहिती सन २००० ते २००६ या कालावधीकरिता रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती.  अपीलार्थीने त्यांच्या अर्जाबरोबर ते दारिद्र्य रेषेखालील असल्याचे प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केले आहे.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या कडील दिनांक ०७-११-२००६ च्या पत्रान्वये, त्यांच्याकडे सदर माहिती उपलब्ध आहे परंतु स्टेशनरी करिता त्यांच्याकडे निधी उपलब्ध नसल्याने ती सदर माहिती आवश्यक असल्यास स्वखर्चाने घेऊन जाण्याचे सुचित केले आहे व त्याच बरोबर निधी प्राप्त होताच ही माहिती अपीलार्थीस देण्याची तयारी दर्शविली आहे.  दुसरा मुद्दा म्हणजे, अपीलार्थीस धरणग्रस्त प्रमाणपत्र देण्यात

आलेल्या व विनंतीच्या दिनांका संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस असे कळविले आहे की धरणग्रस्त प्रमाणपत्र त्यांच्या कार्यालयातून दिले जात नसून या संदर्भात, त्यांनी अपीलार्थीस जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांचे कार्यालयाशी संपर्क साधण्यास सूचित केले होते. जन माहिती अधिकारी यांची दुस-या मुद्याबाबतची कृती चुकीची असून त्यांनी अपीलार्थीच्या अर्जाची प्रत संबंधित अधिका-याकडे ५ दिवसाच्या आत पाठवून त्यांना ही माहिती अपीलार्थीस पुरविण्याची विनंती करावयास हवी होती तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २७-११-२००६ चे सदर पत्र अपीलार्थीस दिनांक १२-११-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे कागदपत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर आज सादर केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या वरील माहितीने अपीलार्थीचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) नुसार जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि या अपीलावर सुनावणी झाल्याचे उपलब्ध कागदपत्रा वरुन दिसून येत नाही. आज जन अपीलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की अपीलार्थीने केलेले प्रथम अपील जन अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयास प्राप्त न झाल्यामुळे या अपीलावर आजतागायत सुनावणी होऊ शकली नाही. तव्दतच त्यांनी तदनंतर अपीलार्थीस त्यांचे कार्यालयाकडे दिनांक ०४-०५-२००७ रोजी कार्यालय खर्चासाठी निधी उपलब्ध झाल्यामुळे अपीलार्थीस दिनांक १०-०५-२००७ रोजी माहिती पुरविली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले की, अपीलार्थीने जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपीलावर अद्यापपावेतो जन अपीलीय अधिकारी यांनी

सुनावणी घेतली नाही कारण सदर अपील त्यांच्या कार्यालयाकडे अद्यापही अप्राप्त आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे आज शपथपत्रावर सादर केले आहे. राज्य माहिती आयोगाकडे अपीलार्थीने त्यांचे प्रथम अपीलावर समाधान न झाल्यास व्दितीय अपील दाखल करावयाचे असते. अशा प्रकारची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कार्यपध्दती व या प्रकरणी अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे सादर करुन त्याची पोहोच पावती अथवा अन्य कोणताही पुरावा आयोगास सादर न करता, अपिलार्थी आज गैरहजर आहेत हे पाहता असे आदेशित करण्यात येते की, जन अपीलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी लातूर यांनी अपीलार्थीच्या त्यांच्याकडे केलेल्या दिनांक २६-१२-२००६ अपीलावर प्रथम निर्णय घ्यावा. या निर्णयाने जर अपीलार्थीचे समाधान झाले नाही तर अपीलार्थी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये परत व्दितीय अपील करु शकतील. राज्य माहिती आयोगाने अपीलार्थीच्या १९ (३) या कलमा खाली केलेल्या व्दितीय अपीलावर निर्णय देण्या साठी अपीलार्थीने प्रथम अपीलावर सक्षम प्राधिकरणाकडून निर्णय प्राप्त करुन घेणे गरजेचे आहे. तेव्हा अपीलार्थीने त्यांचे प्रथम अपील जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम दाखल करावे. जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीचे सदर अपील प्राप्त झाल्या नंतर प्राधान्याने अपीलार्थीच्या अपीलासंदर्भात योग्य तो निर्णय त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील १९ (१) अन्वये प्राप्त झालेल्या या विषयावरील प्रथम अपीलावर १५ दिवसाच्या आत निर्णय द्यावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे दिनांक ०७-०२-२००७ चे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५ जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. धोंडीराम हानमंतराव नळेगावे, रा. संगाचीवाडी, पोस्ट शेळगाव तालुका चाकूर जिल्हा लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष भुसंपादन अधिकारी, स्वर्णा प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. सोबत अपीलार्थीच्या अपीलाची प्रत त्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये निर्णय घेण्यास्तव.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३४१

निर्णय दिनांक ०५-०६-२००७

श्री. धोंडीराम हानमंतराव नळेगावे, : अपीलार्थी
रा. संगाचीवाडी, पोस्ट शेळगाव तालुका चाकूर
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा विशेष भुसंपादन अधिकारी,
स्वर्णा प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हाधिकारी लातूर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. धोंडीराम हानमंतराव नळेगावे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा विशेष भुसंपादन अधिकारी, स्वर्णा प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर डॉ. भारत नारायण बस्तेवाड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी लातूर (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे अनुपस्थित आहेत. जन अपीलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीची सखेद नोंद आयोगाने घेतली असून येथून पुढे आयोगाच्या सुनावणीसाठी ज्या ज्या वेळी बोलावणे येईल त्या त्या

वेळी त्यांना हजर राहण्याच्या सूचना महसूल आयुक्त औरंगाबाद विभाग यांनी द्याव्यात व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत पाठवावा असे त्यांना सुचित करण्यात येते.

या प्रकरणी सर्व प्रथम अपीलार्थीने त्यांचे दिनांक ३०-१०-२००६ रोजीच्या अर्जा अन्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> “ संगमवाडी बृ. ल. पा. प्रकल्प तालुका चाकूर जिल्हा लातूर येथील भुसंपादन प्रक्रियेतील प्रस्तावित प्रक्रियेत संपूर्ण बुडित क्षेत्रातील (अ) फाईल नं. १९९८/भु.स./स्वर्णा/सीआर-०१ मौजे संगमवाडी शेळगाव कलम १२ (२) च्या नोटीस संच नोटीफिकेशन घोषवारा व जमिनीचा निवाडा ई स्टेटमेंट (ब) मौजे डोंगरज व सांडोळ शिवारातील संपादित क्षेत्राची कलम १२ (२) च्या नोटीस संच व नोटीफिकेशन घोषवारा जमिनीचा निवाडा स्टेटमेंट ई या जमिनीचा निवाडा इत्यादी व फळझाडे वनझाडे इत्यादी प्रत्येक बाबीचे मुल्यांकन स्टेटमेंटसह वर उल्लेखित सह संपूर्ण माहिती संच मिळणेबाबत प्रमाणित प्रत तातडीने मिळणेबाबत.”

अपीलार्थीने सदर माहिती सन २००० ते २००६ या कालावधीकरिता रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती. अपीलार्थीने त्यांच्या अर्जाबरोबर ते दारिद्र्य रेषेखालील असल्याचे प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केले आहे.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या कडील दिनांक ३०-११-२००६ च्या पत्रान्वये त्यांच्या कार्यालयास निधी उपलब्ध नसल्यामुळे निधीची मागणी शासनाकडे करण्यात येत आहे व शासनाकडून निधी प्राप्त होताच आपणास मोफत प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील अशी तयारी दर्शविली आहे व त्याच बरोबर जर सदर माहिती आपणास तातडीने हवी असेल तर त्यांना संबंधित माहितीच्या प्रमाणित प्रती अभिलेख

कक्षाकडून हस्तगत करुन घेण्याचे सुचविले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीचा अर्ज अंशतः मान्य केल्याचे म्हटले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील प्रकारच्या प्रतिसादामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलार्थीने दिनांक २६-१२-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये जन अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. तथापि हे अपील जन अपीलीय अधिकारी यांना प्राप्त झाले नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणी मध्ये शपथपत्रावर लिहून दिले आहे. जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून या अपीलाची सुनावणी न घेण्यात आल्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये अपीलार्थीने आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपीलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपीलार्थीस संगमवाडी बृ. ल.पा. प्रकल्पा अंतर्गत संपूर्ण बुडीत क्षेत्रातील संपादित होणा-या जमिनीच्या क्षेत्राची मौ. संगाचीवाडी, शेळगाव, सांडोळ, डोंग्रज या वेगवेगळ्या घोषित झालेल्या गावांच्या कलम १२/२ च्या नोटिफिकेशनची प्रत गोषवारा जमीन निवाडा स्टेटमेंट, फळझाडे व वन झाडे, विहिरी मोटार पाईपलाईन इत्यादी प्रत्येक बाबीचे मुल्यांकन स्टेटमेंट व या संदर्भातील त्यांचे कार्यालया कडून जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती हव्या आहेत असे दिसून येते.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले की, अपीलार्थीने जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपीलावर अद्यापपावेतो जन अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही कारण सदर अपील त्यांच्या कार्यालयाकडे अद्यापही अप्राप्त आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे आज शपथपत्रावर सादर केले आहे. राज्य माहिती

आयोगाकडे अपीलार्थीने त्यांचे प्रथम अपीलावर समाधान न झाल्यास व्दितीय अपील दाखल करावयाचे असते. अशा प्रकारची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कार्यपध्दती व या प्रकरणी अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे सादर करुन त्याची पोहोच पावती अथवा अन्य कोणताही पुरावा आयोगास सादर न करता, अपिलार्थी आज गैरहजर आहेत हे पाहता असे आदेशित करण्यात येते की, जन अपीलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी लातूर यांनी अपीलार्थीच्या त्यांच्याकडे केलेल्या दिनांक २६-१२-२००६ अपीलावर प्रथम निर्णय घ्यावा. या निर्णयाने जर अपीलार्थीचे समाधान झाले नाही तर अपीलार्थी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये परत व्दितीय अपील करु शकतील. राज्य माहिती आयोगाने अपीलार्थीच्या १९ (३) या कलमा खाली केलेल्या व्दितीय अपीलावर निर्णय देण्या साठी अपीलार्थीने प्रथम अपीलावर सक्षम प्राधिकरणाकडून निर्णय प्राप्त करुन घेणे गरजेचे आहे. तेव्हा अपीलार्थीने त्यांचे प्रथम अपील जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम दाखल करावे. जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीचे सदर अपील प्राप्त झाल्या नंतर प्राधान्याने अपीलार्थीच्या अपीलासंदर्भात योग्य तो निर्णय त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील १९ (१) अन्वये प्राप्त झालेल्या या विषयावरील प्रथम अपीलावर १५ दिवसाच्या आत निर्णय द्यावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे दिनांक ०७-०२-२००७ चे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५ जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. धोंडीराम हानमंतराव नळेगावे, रा. संगाचीवाडी, पोस्ट शेळगाव तालुका चाकूर जिल्हा लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष भुसंपादन अधिकारी, स्वर्णा प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. सोबत अपीलार्थीच्या अपीलाची प्रत त्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये निर्णय घेण्यास्तव.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/३४२/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक ०६ जून, २००७.

१. श्री.देवेंद्र शरदकुमार देव, .. अपिलार्थी.
राहणार- धनुर्धारी, १२७/७,
समर्थनगर, औरंगाबाद.
विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
तहसीलदार, औरंगाबाद.

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०६ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी देवेंद्र शरदकुमार देव, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) ,जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार,औरंगाबाद , श्रीमती अपर्णा सोमानी, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी या संबोधण्यात येईल) हजर आहेत जन अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे आयोगाच्या पूर्व परवानगी शिवाय गैरहजर आहेत. त्यांच्या या कृतीची आयोगाने सखेद नोंद घेतली असून, जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येते की, संबंधित जनअपिलिय अधिका-यास येथून पुढे त्यांना ज्या-ज्या वेळी आयोगाच्या सुनावणीसाठी बोलाविण्यात येईल, त्या-त्या वेळी त्यांनी आयोगासमोर हजर राहावे. अशा सूचना द्याव्यात व आपला अनुपालन अहवाल आयोगास सात दिवसात सादर करावा.

या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक- ०५-१२-२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जानूसार जनमाहिती अधिकारी यांच्याकडे निर्माण भारती लॅण्ड मार्क प्रा.लि. यांनी

खरेदी केलेला सर्वे नंबर ८३ व ९१ च्या ७/१२ वर घेतलेल्या नोंदी बाबत खालील एकूण चार मुद्यांवर माहिती मागितली होती.

“ १) सर्वे नं.८३ व ९१ यांची ७/१२ वरील आणेवारीनुसार किंमत अनुक्रमे ७ रुपये ३० पैसे व १० रुपये ३० पैसे असे दाखवलेली आहे, ति पाच रुपयांपेक्षा जास्त असल्यामुळे याला लावण्यात आलेल्या शेतसारा व तो भरल्याची पावती मला देण्यात यावी.

२) सर्वे नं. ८३ व ९१ च्या जमीनीवर अनेक घरे बांधण्यात आलेली आहेत. त्याला लावण्यात आलेल्या अकृषीक कराची प्रत्येक घरनिहाय माहिती देण्यात यावी. तसेच अकृषीक कर भरल्याच्या पावत्या मला दाखवण्यात याव्या.

३) खरेदीखतावर ज्यांनी जागा विकली त्या श्री.समदाणी व श्री.अग्रवाल यांच्या कुटुंबीया व्यतीरीक्त इतर ३२ जणांची नांवे व सध्या आहेत त्या ३२ जणांच्या नावांचे नोंद असलेला ७/१२ मला दाखवण्यात यावा व त्याची प्रत देण्यात यावी.

४) सर्वे नं ८३ च्या जागेपैकी काही जागा शासनाने शासकीय ग्रंथालयासाठी संपादीत केलेली आहे. त्याची नोंद ७/१२ वर घेतलेली आहे. त्यावर त्यांनी इमारत बांधलेली आहे. त्यांना लावण्यात आलेल्या अकृषीक कराची माहिती व ते क्षेत्र सर्वे नं. ८३ च्या सातबारामधुन वगळण्यात आल्याच्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती मला देण्यात यावी.”

सदर माहितीचा कालावधी सुरुवाती पासून ते आजपर्यंत असे अपिलार्थीने दर्शविलेला असून सरल माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या वरील माहितीच्या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक- ११९, दिनांक- २९-१२-२००६ अन्वये अपिलार्थीस, त्यांनी विचारलेल्या चार मुद्यावर माहिती दिली आहे. यापैकी मुद्दा क्रमांक- १ च्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी, शेतसा-या बाबत आपण संबंधित तलाठी यांच्याकडून माहिती घ्यावी, असे अपिलार्थीस उत्तर दिले आहे. जनमाहिती अधिकारी यांच्या या कृती बद्दल त्यांना खुलासा विचारला असता, त्यांनी तलाठी हे देखील जनमाहिती अधिकारी आहेत, असे आयोगासमोर सांगितले.

या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक- १ च्या संदर्भात कार्यवाही करण्याकरिता अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जाची प्रत तलाठी यांना पाठविण्यास हवी होती. तथापि त्यांनी त्यांचे दिनांक- २०-०१-२००७ रोजीच्या पत्रा अन्वये संदर्भीत तलाठयास पत्र लिहून अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती आठ दिवसात पुरविण्याच्या सूचना दिल्या आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी तलाठयास पाठविलेल्या पत्राचे अवलोकन करता जनमाहिती अधिकारी यांनी या पत्रामध्ये जरी अपिलार्थीने मूळ माहितीच्या अर्जाची छायांकितप्रत सोबत जोडली, असे म्हटले आहे तरी प्रत्यक्षात तलाठी यांना अपिलार्थी यांच्या मूळ माहितीच्या अर्जाची प्रत या पत्रासोबत न जोडता तलाठयास त्यांनी त्यांच्या कार्यालयात बोलावून दाखविला होता, असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच या पत्रामध्ये संबंधीत तलाठयास अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक-४ बाबत माहिती देण्यांचे सूचीत केले आहे तर या पत्रामध्ये अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्या क्रमांक १

बाबत सूचना दिली गेली नसल्याचे दिसून येते.  सदर विसंगती जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत असून अशा प्रकरणी त्यांनी अधिक सतर्क रहावे अशी समज त्यांना आयोगातर्फे देण्यात येत आहे.

जनमाहिती अधिकारी यांचे वरील दिनांक- २९-१२-२००६ चे पत्र अपिलार्थीस दिनांक- ०३-०१-२००७ रोजी प्राप्त झाले. तथापि या उत्तरावर त्यांचे समाधान न झाल्यामूळे त्यांनी जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०४-०१-२००७ रोजी प्रथम अपिल केले. ( अपिलार्थीच्या मूळ प्रथम अपिलावर दिनांक- ०४-१०-२००६ अशी तारीख दिसून येते, ती चुकीने टाकल्याचे अपिलार्थीने, आज आयोगासमोर कबुल केले आहे.) हे अपिल करण्याचे कारण म्हणजे त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडून असमाधानकारक उत्तर व अपूर्ण माहिती मिळाल्याचे दिले आहे.

अपिलार्थीच्या या अपिलावर दिनांक- १७-०१-२००७ रोजी जनअपिलिय अधिकारी यांनी प्रथम सुनावणी घेवून अपिलार्थीस, जनमाहिती अधिकारी यांनी प्रश्नार्थक स्वरुपातील माहिती सोडून इतर उपलब्ध सर्व कागदपत्राच्या झेरॉक्सप्रती अपिलार्थीस आठ दिवसात देण्याचे सूचीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे वेळोवेही स्वतः जावून या माहिती संदर्भात विचारणा केली असल्याचे अपिलार्थी यांनी सांगितले. तर जनमाहिती अधिकारी यांनी  स्वतः अपिलार्थी हे त्यांच्याकडे  कधीच गेले नसल्याचे आयोगासमोर स्पष्ट केले. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, वरील सर्व माहिती त्यांच्याकडे आजमितीस तयार असून त्या ही सर्व माहिती अपिलार्थीस

देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागिलेली माहिती व्यक्तीशः अपेक्षीली असल्यामूळे सदर माहिती त्या अपिलार्थीस व्यक्तीशः देवू ईच्छीतात.

जनअपिलिय अधिकारी यांनी  यांच्या या निर्णयावर अपिलार्थीचे समाधान न झाल्यामूळे  अपिलार्थीने व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे  दिनांक- ०८-०२-२००७ रोजी  आपल्या माहितीच्या मूळ अर्जाची मागणी कायम ठेवून व्दितीय अपिल केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या चारहि मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देण्याचे आयोगासमोर कबुल केले आहे.

अपिलार्थीने विचारलेल्या माहिती पैकी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध नसल्यास त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती देतांना त्या माहितीची सद्यस्थिती अपिलार्थीस द्यावी, असे त्यांना सूचीत करण्यात येत आहे. त्याच बरोबर अपिलार्थीने मागितलेली माहिती ही औरंगाबाद येथील सर्वेनंबर ८३ व ९१ संबंधीची असून  या जमिनीच्या मालकी हक्का बाबत  न्यायालयात वाद चालू असून या सर्व्हेनंबर मधील जमिनीचे खरेदीविक्रीचे व्यवहार राजरोसपणे पार पडत आहेत व त्याच बरोबर या सर्व्हे नंबरवर जी बांधकामे झाली आहेत त्यांचेकडून अकृषिक कराची महसूल विभाग वसूली करत नाही मात्र अपिलार्थी हे याच सर्व्हे नंबरचे समोर राहत असून त्यांचेकडून मात्र अकृषिक कराची वसूली केली जाते असे अपिलार्थीने आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे. तेंव्हा या प्रकरणाची जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांनी  वेळेतच

दखल घेवून या प्रकरणी अर्जदारास योग्य तो न्याय मिळवून द्यावा, असे जिल्हाधिकारी यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेंचनाच्या अनुषंगाने अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली पूर्ण माहिती स्वयंस्पष्ट अभिप्रायासहित ( आवश्यक असल्यास ) तीन दिवसात विनामुल्य पुरवावी, असे आदेशीत करण्यात येत आहे. त्याच बरोबर अपिलार्थीने मागणी केल्यास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार संबंधीत सर्व्हेनंबरच्या संदर्भातील सर्व नस्त्या अपिलार्थीस पाहण्यासाठी प्राधान्याने उपलब्ध करुन द्याव्यात, असे आदेशीत करण्यात येत आहे. वरील विवेंचनासह अपिलार्थीचे अपिल निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

६. अपील निकाली काढण्यात येत आहे.

७. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली पूर्ण माहिती स्वयंस्पष्ट अभिप्रायासहित ( आवश्यक असल्यास ) तीन दिवसात अपिलार्थीस विनामुल्य पुरवावी,

औरंगाबाद
दिनांक ०६ जून,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.देवेंद्र शरदकुमार देव, राहणार- धनुर्धारी, १२७/७, समर्थनगर, औरंगाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ जिल्हाधिकारी, औरंगाबाद, यांना वरील नोंद घेण्यासाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/३४६/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ०७ जून, २००७.

१. श्री.पंढरीनाथ रघुनाथ बिजमवार .. अपिलार्थी.
सेवानिवृत्त मुख्याधिकारी, रा.उमरी,
ता.उमरी,
जिल्हा-नांदेड, (महाकाली मंदिरा
जवळ)

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
जिल्हा प्रकल्प अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड.
२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
अपर जिल्हाधिकारी, नांदेड.

**<u>विवेचन</u>**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०७ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री.पंढरीनाथ रघुनाथ बिजमवार ,(येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत तर जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड, श्री. जयंत बळीराम दांडेगावकर (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड, श्री.श.न.देवधरे, (येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक- २६-०५-२००६ रोजीच्या अर्जा अन्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून नगर परिषद, कुंडलवाडी यांच्या लेखापरिक्षणा संदर्भात, अपिलार्थीने जिल्हाधिकारी,नांदेड यांच्याकडे केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागविली आहे.

अपिलार्थीने माहिती अर्जा सोबत जोडलेल्या त्यांचे दिनांक- ०१-०२-२००६ रोजीच्या अर्जातील मजकूराचे अवलोकन केले असता अपिलार्थीने आर्थीक वर्ष १९८८-८९,१९८९-९०, १९९३-९४ ते १९९७-९८, १९९९ -२००० ते २००० - २००१ या कालावधीतील लेखापरिक्षण पथकाने उपस्थित केलेल्या आक्षेपांच्या पूर्तते संदर्भात जनमाहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षिली आहे. त्याच बरोबर त्यांनी जिल्हाधिकारी,नांदेड यांना, मुख्याधिका-यास निलंबीत करुन त्यांची विभागीय चौकशी करावी व नगरपरिषद, कुंडलवाडी मध्ये जो भ्रष्टाचार व अपहार झाला आहे.

ती रकम वसूल करुन संबंधीत कर्मचा-यावर गुन्हाही दाखल करण्याची विनंती केली आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रामध्ये, त्यांचा दिनांक- ०१-०२-२००६ रोजीचा अर्ज जिल्हाधिकारी,नांदेड यांना उद्देशून केलेला आहे. जनमाहिती अधिकारी यांच्याकडे या अर्जाची नोंद नाही. अपिलार्थीने हा अर्ज वास्तविक जनमाहिती अधिकारी यांच्याकडे पाठवयास हवा होता. जनमाहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेला अर्ज, विभागीय महसूल आयुक्तांकडून प्राप्त झाल्याचे दिसून येते. या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- २७-०६-२००६ रोजी उत्तर देवून माहिती दिली आहे. तथापि या पत्रावर वरील अर्जाचा संदर्भ का नाही, हे विचारले असता, अपिलार्थी याच विषयावर वेळोवेळी पत्रव्यवहार करीत असल्यामूळे, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीच्या दिनांक- २७-०६-२००६ च्या पत्रात संदर्भ म्हणून अपिलार्थीच्या २६-०५-२००६ च्या पत्राचा उल्लेख झालेला नाही, असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर शपथपत्रावर सांगितले.

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- २७-०६-२००६ रोजी संबंधीत माहिती पुरविली असल्याचे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, त्यांनी अपिलार्थीस हवी असलेली काही माहिती दिल्याचे दिसते. जनमाहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीवर समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १४-०७-२००६ प्रथम अपिल केले. सदर अपिलाची सुनावणी जनअपिलिय अधिकारी

यांनी दिनांक- २२-१२-२००६ रोजी घेवून जनअपिलिय अधिकारी यांनी सुनावणीचा निर्णय दिनांक- २६-१२-२००६ रोजी दिला. प्रत्यक्षात हा निर्णय दिनांक- ०२-०१-२००७ रोजी लिखित स्वरुपात पारीत केला.

अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपिलावर सुनावणी दिनांक- २२-१२-२००६ रोजी घेतली. म्हणजेच सुमारे साडेपाच महिने इतक्या उशिराने सदर सुनावणी का घेतली, याचे कारण जनअपिलिय अधिकारी यांना विचारता, त्यांनी त्यांच्याकडे सदर अपिल अर्ज दिनांक- ११-१२-२००६ रोजी प्राप्त झाला व त्यांनी सुनावणी दिनांक-२२-१२-२००६ रोजी म्हणजेच अकरा दिवसात घेतल्याचे आयोगा समोर सांगितले.

जिल्हाधिकारी,नांदेड कार्यालय व जनअपिलिय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांचे कार्यालय हे एकाच इमारतीमध्ये आहे. दोन्हीही अधिका-यांची कार्यालये एकाच इमारतीमध्ये असून देखील अपिलार्थीकडून दाखल होणा-या या अपिला संदर्भात जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून इतक्या उशिराने सदरचे अपिल जाणे या एवढया छोटया प्रक्रियेला पाच महिन्याचा कालावधी लागावा. ही आश्चर्याची बाब आहे. जिल्हाधिकारी नांदेड यांना असे सूचीत करण्यात येते की, त्यांनी आपल्या कार्यालयातील पत्रव्यवहाराचा निपटारा विशेषतः माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या संबंधात प्राप्त झालेल्या पत्रव्यवहाराचा निपटारा प्राथम्याने व वेळीच करावा, आवश्यक वाटल्यास प्रचलित पध्दतीमध्ये त्यांनी योग्य तो बदल करावा. परंतू कोणत्याही परिस्थितीत जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचे अपिल पाच दिवसाच्या आत पोंहचणे व त्यावर सुनावणी होवून निर्णय होणे इत्यादी व इतर अनुषंगिक प्रक्रियेमध्ये माहिती अधिकार अधिनियम

२००५ मधील विहित केलेल्या तरतुदींचे पालन गांभीर्यर्पूव व वेळेत होईल, असे पहावे. असे त्यांना सूचीत करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देतांना, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक- १८-०१-२००७ पर्यंत नोंदणी डाकेने पाठविण्यात यावी, अशा सूचना जनअपिलिय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना दिल्या आहेत. जनअपिलिय अधिकारी यांच्या या निर्णयावर संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी ही माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता  मुख्याधिकारी, नगरपरिषद, कुंडलवाडी यांच्याकडे दिनांक- ०३-०१-२००७ रोजीच्या पत्रा अन्वये अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देणे बाबत सुचविले आहे. तद्नंतर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे दिनांक- ०८-०५-२००७ रोजीच्या पत्रा अन्वये संबंधित मुख्याधिकारी यांच्याकडे ही माहिती देण्याकरिता पाठपुरावा केला आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी आयोगा समोर असे सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही कुंडलवाडी नगरपरिषदेच्या लेखापरिक्षणाची  सन १९८८-८९ ते २०००-२००१ या कालावधी मधील वेगवेगळया वर्षातील लेखापरिक्षणाच्या संदर्भातील आहे. सदर कार्यालयाचे लेखापरिक्षण हे उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, औरंगाबाद यांच्या कार्यालयातर्फे करण्यात आले आहे. सदर लेखापरीक्षण दरवर्षी नियमीतपणे केले जाते. या लेखापरिक्षणामध्ये काही आक्षेपार्ह बाबी आढळल्यास हे पथक हया बाबी नोंदविते व या आक्षेपाचे अंतिम अनुपालन झाल्या नंतर हे आक्षेप बंद होतात, असे या लेखापरिक्षण पध्दतीचे थोडक्यात  स्वरुप आहे. अपिलार्थीस या लेखापरिक्षणातील

आक्षेपांची उपरोक्त कालावधीतील सद्यस्थिती हवी आहे व त्याच बरोबर अपिलार्थीस मुख्याधिकारी यांना निलंबीत करुन हवे आहे.

जनमाहिती अधिका-यास अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रथमतः संबंधीत नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांचेकडून मागवावी लागते व तद्नंतर ती माहिती अपिलार्थीस द्यावी लागते. वास्तविक अपिलार्थीने ही माहिती जर सबंधित नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांचेकडून मागवून त्यावर त्यांचे समाधान न झाल्यास जनअपिलिय अधिकारी तथा उपआयुक्त, नगरप्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचेकडे प्रथम अपिल केले असते तर अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती कदाचित आतापर्यंत त्यांना मिळाली असती, तथापि अपिलार्थीने तसे न करता जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्याकडे या माहितीची वेळोवेळी मागणी केल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या व्दितीय अपिलाच्या विषयाची व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्राची पहाणी करता, असे आदेशीत करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी स्वतः नगरपरिषद, कुंडलवाडीच्या कार्यालयास भेट देवून अपिलार्थीने मागितलेली माहिती (लेखापरिक्षण अहवालाबाबत नगरपरिषदेच्या सद्यस्थितीची) संबंधित मुख्याधिकारी यांच्याकडून हस्तगत करावी व ती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी. त्याचबरोबर ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील विहित कालावधी मध्ये देण्यास नगरपरिषदेकडील जे कर्मचारी/ अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (शिस्त व अपिल नियम) अन्वये

विभागीय चौकशीची कार्यवाही करावी / योग्य त्या प्राधिकरणाकडे प्रस्तावित करावी. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

**निर्णय**

८. अपील निकाली काढण्यात येत आहे.

९. जनमाहिती अधिकारी यांनी स्वतः नगरपरिषद, कुंडलवाडीच्या कार्यालयास भेट देवून अपिलार्थीने मागितलेली माहिती (लेखापरिक्षण अहवालाबाबत नगरपरिषदेच्या सद्यस्थितीची) संबंधित मुख्याधिकारी यांच्याकडून हस्तगत करावी व ती अपिलार्थीस हे आदेश जनमाहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यापासून सात दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

१०. अपिलार्थीने मागितलेली माहिती (लेखापरिक्षण अहवालाबाबत नगरपरिषदेच्या सद्यस्थितीची) अपिलार्थीस देण्यास नगरपरिषदेकडील जे कर्मचारी/ अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (शिस्त व अपिल नियम) अन्वये विभागीय चौकशीची कार्यवाही करावी / योग्य त्या प्राधिकरणाकडे प्रस्तावित करावी.

औरंगाबाद
दिनांक ०७ जून,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.पंढरीनाथ रघुनाथ बिजमवार, सेवानिवृत्त मुख्याधिकारी, रा.उमरी, ता.उमरी, जिल्हा-नांदेड, (महाकाली मंदिरा जवळ)

२ जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ जिल्हाधिकारी, नांदेड यांना नोंद घेण्यासाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३४७

निर्णय दिनांक ०७-०६-२००७

श्रीमती बागरे वंदनाबाई भगवानराव, : अपीलार्थी

शोभानगर, सहकारी गृहनिर्माण संस्था,

(विमानतळापाशी) घर नं. १३० (ब), तालुका

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा विशेष समाज कल्याण अधिकारी, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा संचालक विमुक्त जाती व भटक्या जाती

मागासवर्गीय संचालनालय पुणे

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्रीमती बागरे वंदनाबाई भगवानराव ह्या गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा विशेष समाज कल्याण अधिकारी, नांदेड श्री. अविनाश रघुनाथ देवसटवार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी लातूर श्री. शंकरराव बापुराव भंडारे (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. सहाय्यक संचालक श्री. आ. पा. कांबळे संचालक विमुक्त जाती व भटक्या जाती मागासवर्गीय कार्यालय संचालनालय पुणे हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम दिनांक ०४-१२-२००६ रोजी त्यांचे कडील अर्जा अन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१. प्रा. आश्रमशाळेतील मा. उच्च न्यायालय मुंबई स्थगिती आदेश ४८५६/१९९९ नुसार डी. एड वेतनश्रेणीत बी. एड व बी. पी. एड शिक्षक किती ? व किती शिक्षकांना डी. एड न करता व डी. एड केल्यानंतर पुर्ववत वेतनश्रेणी व वेतनवाढ दिली याची माहिती मिळणेबाबत.

२. वि. जि. स. कल्या. कार्यालय जा. क्र. १२६० दि. १८-०३-२००६ ची संच मान्यतेची सत्यप्रत मिळणेबाबत.

३. डी. एड वेतनश्रेणीतील बी. एड व बी. पी. एड शि. किती ? किती शिक्ष. पुर्ववत वेतनश्रेणी व वेतनवाढ संबंधी माहिती

४. वि. जि. स. क. का. जा. क्र. १२६० दि. १८-०३-०६ ची संच मान्यतेची सत्यप्रत मिळणेबाबत.

५. ०१ सप्टेंबर १९९९ पासून २००६ पर्यत (बी) २००६ कालावधी

६.	वरील माहिती ०१ सप्टेंबर १९९९ पासून २००६ पर्यतची माहिती मिळणे बाबत.

७.	वि. जि. स. क. का. जा. क्र. १२६० दि. १८-०३-२००६ संच मान्यतेची सत्यप्रत मिळणे."

सदर माहिती ८ वर्ष कालावधीतील आहे.  तसेच सदर माहिती अपीलार्थी यांनी प्रत्यक्ष नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या या अर्जावर प्रतिसाद म्हणून जन माहिती अधिकारी यांनी लेखी स्वरुपात काहीही कारवाई न करता ही माहिती संबंधित मुख्याध्यापकाकडे जानेवारी २००७ या महिन्या तील एका बैठकीत तोंडी मागितली असे त्यांनी आज आयोगासमोर सांगितले.

विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थीने संचालक विमुक्त जाती व भटक्या जाती व व इतर मागासप्रवर्ग कल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) नुसार दिनांक ०९-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले तथापि या प्रकरणी ते अपीलीय अधिकारी नाहीत.  प्रत्यक्षात जन अपीलीय अधिकारी हे विभागीय समाजकल्याण अधिकारी लातूर हे आहेत.

अपीलार्थीचे दिनांक ०९-०१-२००७ रोजीचे अपील, संचालक विमुक्त जाती व भटक्या जाती व व इतर मागासप्रवर्ग कल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाने, जन माहिती अधिकारी तथा विशेष समाज कल्याण अधिकारी नांदेड यांच्याकडे त्यांचे कडील पत्र दिनांक २७-०२-२००७ रोजी नुसार पाठविले व जन माहिती अधिकारी यांनी यावर कोणतीही कार्यवाही न करता हे अपिल त्यांचे कार्यालयाकडे तसेच विना कारवाई ठेवून दिले. वास्तविकतः संचालक विमुक्त जाती व भटक्या जाती व व इतर मागासप्रवर्ग कल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांनी, या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी नसल्याने, हे अपील विभागीय समाजकल्याण अधिकारी लातूर यांचे कडे त्वरीत पाठविणे आवश्यक

असतांना देखील त्यांचे स्तरावर चुकीची कारवाई व तीही एक महिना १७ दिवस इतक्या विलंबाने झाल्याचे दिसून येते. अपीलार्थीच्या या अर्जावर सामाजिक न्याय विभागाच्या क्षेत्रीय स्तरावरील कोणत्याही अधिका-याने जबाबदारीने कारवाई केली नसल्याचे या प्रकरणात दिसून येते. या विभागाच्या कोणत्याही क्षेत्रीय विभागाकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलार्थीने माहिती अधिकारी अधिनियम २००५ चे कलम १९ (३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर असे सांगितले की त्यांनी अपीलार्थीस अपेक्षित असलेली माहिती स्वतः व्यक्तीशः दिनांक ०६-०६-२००७ रोजी पुरविली आहे. आजच्या घडीला जरी ही माहिती अपीलार्थीस मिळाली असली तरी, ही माहिती देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या क्षेत्रीय अधिका-याकडून जी दिरंगाई झाली आहे त्याबाबतचा खुलासा जन माहिती अधिकारी यांना विचारला असता त्यांनी अपीलार्थीनी मागितलेली माहिती त्यांच्या कार्यक्षेत्रात ६४ शाळांकडून प्राप्त करुन घेण्यात आली व त्यामुळे हा विलंब लागला असे सांगितले. प्राथमिक / माध्यमिक आश्रमशाळेतील शिक्षकांच्या शैक्षणिक पात्रतेसंदर्भात व वेतनश्रेणी संदर्भात सर्व माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असावयास हवी कारण या सर्व शिक्षकांची वेतनश्रेणी व वेतनवाढ इत्यादी सर्व सेवा विषयक बाबी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून नियंत्रित केल्या जातात. याच बरोबर संबंधित शिक्षकांचे दरमहाचे वेतन देखील जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयामार्फत काढले जाते असे जन अपिलीय अधिकारी यांनी आज आयोगास सांगितले. अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे असावयास हवी, या आयोगाच्या गृहितकाला जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये दुजोरा दिला. अंतीमतः अपीलार्थीस हवी असलेली माहिती विभागीय समाजकल्याण अधिकारी लातूर यांनी आयोगाची नोटीस

प्राप्त झाल्यानंतर त्यांचा प्रतिनिधी जन माहिती अधिका-याच्या कार्यालयात पाठवून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार केली व अपीलार्थीस दिनांक ०६-०६-२००७ रोजी म्हणजे आयोगाच्या या सुनावणीच्या आदल्या दिवशी दिली गेली असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी सांगितले.

अपिलार्थीस वेळेत माहिती न देण्याबद्दल आपणास जबाबदार धरुन आपणास शास्ती का लावू नये असे विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती ६४ शाळांच्या मुख्याध्यापकाकडून गोळा करावी लागत असल्याने एवढा विलंब लागल्याचे सांगितले तथापि वर उल्लेखिल्याप्रमाणे या प्रकरणाची विभागीय समाजकल्याण अधिका-यांनी वेळेतच दखल घेतली नसती तर कदाचित अपिलार्थीस माहितीही मिळाली नसती असे अनुमान काढण्यास हरकत नाही. स्वतःच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस वेळेत देणे या प्रकरणी जन माहिती अधिका-यास सहज शक्य होते तथापि त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिल्याचा पुरावा आज ते आयोगासमोर उपलब्ध करुन देऊ शकले नाहीत. त्यांनी संबंधित मुख्याध्यापकांस तोंडी सूचना दिल्याचे त्यांनी आयोगास सांगितले तथापि या सूचना कधी दिल्या हे विचारले असता ते त्याची विशिष्ट तारीख सांगू शकले नाहीत. या सूचना ज्या बैठकीत दिल्या गेल्या त्याचे इतिवृत्तही ते आयोगास दाखवू शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्याने मागणी केलेली माहिती देण्यापोटी अक्षम्य निष्काळजीपणा व बेपवाई दाखविली असल्याचे अशा रितीने सिध्द होत असल्याने जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी या प्रकरणी माहिती देण्यासाठी केलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत प्रति दिन रुपये २५० प्रमाणे एकूण २५००० रुपये इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीची रक्कम त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसाचे आत शासकीय कोषागारात जमा करावी असे आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणातील सर्व घटनाक्रम पाहता सामाजिक न्याय विभागाच्या क्षेत्रीय कार्यालया तील अधिका-याना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींच्या अंमलबजावणी संदर्भात पुरेसे ज्ञान नाही असे आयोगास आढळून आले आहे तेव्हा सचिव सामाजिक न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्राखालील सर्व क्षेत्रीय अधिकारी यांच्या करिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीच्या संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा व शिबीरे आयोजित कराव्यात.

## <u>निर्णय</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती देण्याबाबत केलेल्या असमर्थनीय विलंबा बाबत त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुद क्रमांक २० (१) च्या आधीन राहून प्रतिदिन रुपये २५० या प्रमाणे एकूण रुपये २५००० ची शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्या पासून ३० दिवसाचे आत एका हप्त्यात शासकीय कोषागारात जमा करावी.

३. सचिव सामाजिक न्याय विभाग मंत्रालय मुंबई त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्राखालील सर्व क्षेत्रीय अधिकारी यांच्या करिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीं च्या अंमलबजावणीच्या संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा व शिबीरे आयोजित करावीत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०७ जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती बागरे वंदनाबाई भगवानराव, शोभानगर, सहकारी गृहनिर्माण संस्था, (विमानतळापाशी) घर नं. १३० (ब), तालुका जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष समाज कल्याण अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक विमुक्त जाती व भटक्या जाती मागासवर्गीय संचालनालय पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव सामाजिक न्याय विभाग मंत्रालय मुंबई ४०० ०३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३५१

निर्णय दिनांक ०७-०६-२००७

श्री. अरविंद बाळासाहेब पतंगे, : अपीलार्थी

मु. पो. आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी,

जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा तहसीलदार कळमनुरी, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपविभागीय अधिकारी हिंगोली

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. अरविंद बाळासाहेब पतंगे (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार कळमनुरी श्री. डी. बी. फुपाटे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी हिंगोली जिल्हा हिंगोली श्री. प्रकाश पिरतवाड (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने त्यांच्याकडील अर्ज दिनांक १६-०५-२००६ अन्वये जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार कळमनुरी यांचेकडे “ कळमनुरी तालुक्यातील अपंग, संजय गांधी निराधार, वयोवृध्द व श्रावणबाळ योजने अंतर्गत लाभार्थींची संपूर्ण नावासहीत यादी, तालुक्यातील मंजूर व नामंजूर करण्यात आलेली यादी, ०१ जानेवारी २००४ पासून वरील योजने अंतर्गत आलेल्या अर्जांची यादी, वरील योजने अंतर्गत आलेल्या अर्जांची संपूर्ण नावासहीत यादी गावाप्रमाणे ” अशी मागणी केली होती. सदर माहिती अपीलार्थीने नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपीलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये जरी तारीख १६-०५-२००६ अशी दर्शविली असली तरी सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दिनांक २६-०५-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते.

अपीलार्थीच्या या जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेल्या अर्जातील माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-१०-२००६ च्या पत्रान्वये कबूल केले आहे. तथापि ही माहिती अर्धवट असल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रावरुन जन माहिती अधिकारी यांनी याच दिवशी अपीलार्थीस ही माहिती देण्यापोटी येणारे शुल्क रुपये ५०० त्यांच्याकडे भरण्याविषयी सुचविल्याचे दिसून येते. पुढील चौकशी मध्ये अपीलार्थी यांनी सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे जमा केले नसल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांचे या उत्तरावर समाधान न झाल्याने अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) नुसार जन अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २२-११-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अपीलावर सुनावणी घेऊन जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २२-१२-२००६ रोजी त्यांचा निर्णय पारीत केला आहे. या निर्णयामध्ये अपीलार्थीने नियमानुसार तहसीलदार कळमनुरी यांच्याकडे फीस भरुन माहिती घ्यावी व तहसीलदार यांनी सदर फी भरुन घेऊन तात्काळ माहिती द्यावी असे आदेश देऊन अपीलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

यावर व्यथित होऊन अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या माहितीची मूळ मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की त्यांनी सदर माहिती अपीलार्थीस दिनांक १६-१०-२००६ रोजी आवश्यक ते शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याविषयी सूचित केले होते. तथापि अपीलार्थीने ते शुल्क त्यांच्या कार्यालयाकडे भरले नाही व त्याच बरोबर जन अपीलीय अधिकारी यांनीही त्यांचे

निर्णयामध्ये अपीलार्थीस आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात भरुन माहिती घेऊन जाण्याचे सुचविले आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले आहे. यावर अपीलार्थीचे म्हणणे असे आहे की ते दारिद्र्य रेषेखाली असल्यामुळे त्यांना हे शुल्क कायद्या अन्वये माफ आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे आजमितीस अपीलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती तयार असून जन माहिती अधिकारी अपीलार्थीस ही माहिती ७ दिवसात देण्यास तयार आहेत असे त्यांनी आयोगासमोर सांगितले. अपीलार्थी यांच्याकडून ते दारिद्र्य रेषे खाली असल्याचे प्रमाणपत्र मागवून घेऊन व त्याची सत्यसत्यता पडताळून जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपीलार्थीस देणे सर्वसाधारण परिस्थितीत अभिप्रेत आहे तथापि या प्रकरणी अपीलार्थीच्या मूळ पत्राची दखलच मुळी ३० दिवसापेक्षा जास्त विलंबाने घेण्यात आली आहे. अपीलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद दिला तोच मुळी दिनांक १६-०५-२००६ रोजी म्हणजे अपीलार्थीने अर्ज केल्या पासून सुमारे साडेपाच महिने इतक्या विलंबाने. त्यांनी या प्रकरणी अर्जदाराच्या प्रथम विनंतीसाठी लावलेला विलंब निश्चितच समर्थनीय नाही एवढेच नव्हे तर हा विलंब माहिती अधिकार अधिनियमाच्या मूलभूत तरतूदीलाच छेद देणारा आहे. सबब जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.तद्वतच अपीलार्थीच्या मूळ अर्जाची दखल इतक्या विलंबाने घेण्यासाठी जबाबदार असलेल्या जन माहिती अधिकारी यांच्यावर जिल्हाधिकारी हिंगोली यांनी यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी / प्रस्तावित करावी असे आदेशित करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अपीलार्थीच्या मूळ अर्जाची दखल इतक्या विलंबाने घेण्यासाठी जबाबदार असलेल्या जन माहिती अधिकारी यांच्यावर जिल्हाधिकारी हिंगोली यांनी यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी / प्रस्तावित करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०७ जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अरविंद बाळासाहेब पतंगे, मु. पो. आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २४८/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक १२ जून, २००७.

१. श्री.अत्तर सरदार खान, .. अपिलार्थी.

राहणार- गोळेगावकर कॉलनी,
रेल्वे स्टेशन, औरंगाबाद.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
उप आयुक्त, महानगर पालिका,
औरंगाबाद.

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
आयुक्त, महानगर पालिका,
औरंगाबाद.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-१२ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री.अत्तर सरदार खान, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा उप आयुक्त, महानगर पालिका, औरंगाबाद, श्री.एम.वाय.कांबळे (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हजर आहेत. तर जन अपिलिय अधिकारी तथा आयुक्त,महानगर पालिका, औरंगाबाद ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे गैरहजर आहेत. त्यांच्या हया गैरहजेरीची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील माहितीच्या अर्जान्वये दिनांक-१८-११-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे ‘‘औरंगाबाद महानगर पालिके

तर्फे घेण्यात आलेल्या महापौर करंडक फुटबॉल स्पर्धा २००७" या संबंधी एकूण अकरा मुद्यांवर माहिती विचारली होती. या मुद्यामध्ये सदर स्पर्धाकरिता महानगर पालिकेकडे करण्यात आलेली आर्थिक तरतूद, स्थायी समितीच्या ठरावाची प्रत, अशा प्रकारच्या स्पर्धा घेण्या संदर्भात महानगर पालिकेच्या कायद्यामध्ये असलेली तरतूद, या संदर्भातील शासनाचे आदेश , भाग घेणा-या फुटबॉल संघाची नांवे व पत्ते, महानगर पालिका व सदर संघ यांच्यात झालेल्या लिखीत कराराची प्रत, या स्पर्धमध्ये पूर्व बंगाल फुटबॉल कलकत्ता संघ, यांना महानगर पलिकेने देय असलेल्या ५०,०००/- रुपयाचा तपशिल, औरंगाबाद जिल्हा फुटबॉल स्पोर्ट असोसिएशन, वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन आणि ऑल इंडिया फुटबॉल असोसिएशन यांच्याकडून या स्पर्धासाठी मिळालेल्या परवानगीच्या प्रती, एकुण स्पर्धा करिता आलेला खर्च, ही स्पर्धा संयोजित करणा-या सचिवांचा पत्ता, जर ही व्यक्ती महानगर पालिकेतील सेवक नसेल तर इतर व्यक्तींना या पदावर नियुक्ती देता येते का व पुढील वर्षी या स्पर्धा कुठे होणार, त्या स्थळाचे नाव, या मुद्यांचा समावेश होता.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षीली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- २०-१२-२००६ पर्यंत कोणतीहि दखल घेतली नसल्याचे आयोगाला उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि दिनांक-२०-१२-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आपण मागितलेल्या एकूण अकरा मुद्याच्या माहिती पैकी पाच मुद्याची माहिती तयार आहे व उर्वरीत सहा मुद्याची माहिती तयार करण्याचे काम चालू आहे. असे त्यांचेकडील दिनांक- २०-१२-२००६ रोजीच्या पत्रा अन्वये कळविले

आहे. याच पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस, त्यांना माहिती देण्याकरिता पंधरा दिवसाचा कालावधी मागितला आहे. अशा प्रकारचा अवधी अपिलार्थीस मागण्याची तरतूद माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये नाही, याची येथे नोंद घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर अपिलार्थीस, जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक- २०-०१-२००६चे पत्रामध्ये  कबुल करुनही कबुल केलेल्या तारखेस देखील अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी माहिती पाठविली नाही, असे दिसून येत आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारची माहिती विहित मुदतीत अपिलार्थीस न मिळाल्यामूळे अपिलार्थीने जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०६-०१-२००७ रोजी प्रथम अपिल केले. या अपिलामध्ये अपिलार्थीने त्यांच्या माहितीच्या अर्जातील, मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

सदर अपिलाची सुनावणी जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- १७-०१-२००७ रोजी घेवून जनमाहिती अधिकारी यांना सुनावणीच्या दिवशीच अपिलार्थीस माहिती देण्याचे जनमाहिती अधिकारी यांना सूचीत केले.

तद्नंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक-१७-०१-२००७ रोजी या अपिलाच्या निर्णयाच्या दिवशी अपिलार्थीने मागितलेली माहिती तयार असल्याचे कळविले.

वरील माहिती अपिलार्थीस चुकीची व अर्धवट वाटल्याने, अपिलार्थीने व्यथीत होवून  राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०९-०२-२००७ रोजी व्दितीय अपिल केले आहे. या अपिलामध्ये औरंगाबाद महानगर पालिकेने या स्पर्धा प्रित्यर्थ केलेल्या

खर्चाचा संपूर्ण तपशील व त्याच बरोबर त्यापृष्ठर्थ संबंधीत बिलाच्या प्रतीची माहिती अपिलार्थीस हवी असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. ही माहिती देण्या प्रित्यर्थ अपिलार्थी यांचेकडून महानगर पालिकाने रुपये ४२६/- इतके शुल्क आकारले आहे व त्याचाही भरणा अपिलार्थीने दिनांक- ०२-०६-२००७ रोजी केलेला आहे. ( पावती क्रमांक २२८९१६)

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थीस, या स्पर्धापोटी महानगर पालिकेने केलेल्या खर्चाचा बाबवार तपशिल व संबंधीत बिलाच्या प्रती अपिलार्थीस हव्या असल्याचे दिसून येते. सुनावणीच्या वेळीहि  अपिलार्थीची भूमीका या बाबतीमध्ये आग्रही असल्याचे दिसून आले. महापौर फुटबॉल स्पर्धा औरंगाबाद येथे  दिनांक- ०३ सप्टेंबर, २००६ ते १७ सप्टेंबर, २००६ हया कालावधीमध्ये घेतल्या गेल्या व अपिलार्थीने ही माहिती लगेचच दोन महिन्याने विचारली आहे. संबंधीत यंत्रणेकडून खर्चाची बिले न आल्यामूळे व काही बिले ही तपासणी प्रक्रियेमध्ये असल्यामूळे, अपिलार्थीस त्वरित अंतिम उत्तर देणे शक्य झाले नाही, असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस ही बिले अंतिम झाल्यानंतर, जनमाहिती अधिकारी यांनी स्वतः होवून देण्यास काहीच हरकत नव्हती. तथापि त्यांनी या प्रकरणी उचीत कार्यवाही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार केली नसल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थीस अपेक्षीत असलेली  सर्व माहिती आजमितीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडे तयार असून, अपिलार्थीस ती दोन दिवसाच्या आत देण्याची तयारी जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी

दर्शविली आहे.  त्याचबरोबर अपिलार्थीस काही शंका असल्यास अपिलार्थीस, महानगर पालिका, औरंगाबाद यांच्याकडील संबंधीत नस्त्या दाखविण्याची तयारी देखील जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीमध्ये दर्शविली आहे. अपिलार्थी हे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या माहितीवर अद्यापहि समाधानी नाहीत. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकीची माहिती दिली असल्याचे  अपिलार्थी हे आज झालेल्या सुनावणीमध्ये आयोगासमोर सांगत आहेत. तव्दतच अपिलार्थीकडून महानगर पालिकाने ही माहिती देण्यापोटी रुपये ४२६/- इतके शुल्क दिनांक- ०२-०६-२००७ रोजी भरुन घेतले आहे. तथापि माहिती पुरवली नसल्याचेही अपिलार्थीने आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे. अपिलार्थीने मूलतः दिनांक- १८-११-२००६ रोजी माहिती मागितल्यानंतर अपिलार्थीकडून दिनांक- ०२-०६-२००७ रोजी म्हणजे सुमारे साडे सहा महिन्यानंतर माहिती देण्यापोटी येणा-या खर्चाचे शुल्क भरुन घेणे ही त्यांची कृती माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रमुख तरतुदींचे ज्ञानही महानगर पालिकेच्या अधिका-यांना नाही, हेच सिध्द करते. तेव्हा महानगर पालिका आयुक्तांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीची / अंमलबजावणी संदर्भात आपल्या अधिकारी / कर्मचा-यांसाठी वेळोवेळी प्रशिक्षण कार्यशाळा / शिबिरे आयोजित करावीत, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकला असता, असेहि आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती मुद्देनिहाय, महानगर पालिका आयुक्त स्तरावर तपासून अचूक व निर्दोष अशी माहिती, जनमाहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर तीन दिवसाच्या आत व्यक्तीशः पुरवावी. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केल्यास  माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार, या स्पर्धा

संबंधातील सर्व नस्त्या, कागदपत्रे अपिलार्थीस त्यांच्या तपासणीसाठी तीन दिवसाच्या आत  प्राधान्याने उपलब्ध करुन द्याव्यात. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी असमर्थनिय विलंब लावल्यामूळे, आयुक्त, महानगर पालिका, औरंगाबाद यांनी त्यांच्यावर यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी, असे आदेशीत करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यापोटीचे शुल्क म्हणून ०२-०६-२००७ रोजी औरंगाबाद महानगर पलिकाकडे पावती क्रमांक- २२८९१६ अन्वये अपिलार्थी यांनी भरलेली रक्कम ४२६/-रुपये  हे आदेश निर्गमीत झाल्या पासून एक दिवसाच्या आत अपिलार्थीस परत करण्यात यावी व तसे केल्याचे आयोगास कळविण्यात यावे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

११. अपील  मान्य करण्यात येत आहे.

१२. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती आयुक्त पातळीवर मुद्देनिहाय तपासून, अचूक व निर्दोष अशी माहिती जनमाहिती अधिकारी यांनी व्यक्तीशः, हे आदेश निर्गमीत झाल्या नंतर तीन दिवसाच्या आत  विनामुल्य पुरवावी.

१३. अपिलार्थी यांनी लेखी मागणी केल्यानंतर  माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार, या स्पर्धा संबंधातील सर्व नस्त्या, कागदपत्रे अपिलार्थीस त्यांच्या तपासणीसाठी तीन दिवसाच्या आत  प्राधान्याने उपलब्ध करुन द्याव्यात.

१४. अपिलार्थी यांनी महानगर पालिका औरंगाबाद यांच्याकडे माहिती मिळण्यासाठी दिनांक- ०२-०६-२००७ रोजी पावती क्रमांक- २२८९१६ अन्वये भरणा केलेली रक्कम ४२६/-रुपये हे आदेश निर्गमीत झाल्या पासून एक दिवसाच्या आत अपिलार्थीस परत करण्यात यावी.

१५. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, माहिती देण्यापोटी असमर्थनिय विलंब लावल्यामूळे, आयुक्त, महानगर पालिका, औरंगाबाद यांनी त्यांच्यावर दोन महिन्यात यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यानंतर तीन महिन्याचे आत अनुपालन अहवाल सादर करावा.

६. आयुक्त, महानगर पालिका औरंगाबाद यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीची / अंमलबजावणी संदर्भात आपल्या अधिकारी / कर्मचा-यांसाठी वेळोवेळी प्रशिक्षण कार्यशाळा / शिबिरे आयोजित करावीत.

औरंगाबाद
दिनांक १२ जून,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.अत्तर सरदार खान, राहणार-गोळेगावकर कॉलनी, रेल्वे स्टेशन, औरंगाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा उप आयुक्त, महानगर पालिका, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा आयुक्त, महानगर पालिका, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ आयुक्त, महानगर पालिका, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द

करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२५

निर्णय दिनांक १४-०६-२००७

श्री. दिपक ज्ञानोबा कांबळे, : अपीलार्थी
पंचायत समिती समोर, बालाजी फूट वेअर
जवळ, मेनरोड, हनुमाननगर, अंबाजोगाई
तालुका अंबाजोगाई जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद
बांधकाम उपविभाग अंबाजोगाई तालुका
अंबाजोगाई जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग
क्रमांक २ जिल्हा परिषद बीड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. दिपक ज्ञानोबा कांबळे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता जिल्हा परिषद उपविभाग (बांधकाम) अंबाजोगाई श्री. एल. जी. जांभळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम) विभाग क्रमांक २ जिल्हा परिषद बीड श्री. यु. जे. डाबे (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील अर्ज दिनांक २८-११-२००६ अन्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

"(१) आपल्या कार्यालयामार्फत कोणकोणत्या ठिकाणी काय कामे झाली व चालू आहेत त्याचे अंदाजपत्रकाचे झेरॉक्स पत्रक सहीत माहिती.

(२) सदरील विविध कामाचे स्वरुप, कामाशी संबंधि जे. ई. / अभियंता आदिची दिनांकासह यादी.

(३) आपल्या कार्यालयाकडून बांधकामासाठी मंजूरी प्रस्ताव व अंदाजपत्रके आदिची तपशीलवार लेखी माहिती.

(४) उपविभागीय अभियंता श्री. एल. जी. जांभळे यांचा या कार्यालयाचा रुजू (पदभार) सांभाळण्याचा दिनांक लेखी द्यावा."

सदर माहिती अपीलार्थीने ०१-०१-२००५ ते २८-११-२००६ या कालावधीतील मागितली होती. अपीलार्थीने ही माहिती शिघ्र डाकेने मागितली असून अपीलार्थी हे दारिद्र्य रेषेखाली असल्याचे त्यांनी या अर्जामध्ये नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या अर्जास अनुसरुन लागलीच कारवाई केली व संबंधित शाखा अभियंता यांच्याकडून सर्व माहिती गोळा करुन अपीलार्थीस आवश्यक

असलेली माहिती तयार केली व त्यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक ८६०/०६ दिनांक २८-१२-२००६ रोजी संबंधित माहिती व्यक्तीशः घेऊन जाण्याबद्दल कळविले. अपीलार्थी हे स्थानिक रहिवासी असल्यामुळे व अपीलार्थीने मागितलेली माहिती २२२३ पृष्ठांची असल्यामुळे पोस्टाचा टाळता येण्याजोगा खर्च टाळण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी यांच्या कार्यालयातील प्रतिनिधी श्री. आबुज बी. एम. (वरिष्ठ सहाय्यक) तथा सहाय्यक माहिती अधिकारी व श्री. गायकवाड ए. आर. तांत्रिक शाखा प्रमुख यांना ही माहिती घेऊन अपीलार्थीकडे पाठविले तथापि ही माहिती स्विकारण्यासाठी अपीलार्थी त्यांनी दिलेल्या पत्त्यावर त्या दिवशी उपलब्ध नव्हते. तदनंतर अपीलार्थीच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधूनही अपीलार्थी यांचा संपर्क होऊ शकला नाही असे आज जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. तदनंतर लागलीच दुस-या दिवशी दिनांक २९-१२-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचा प्रतिनिधी अपीलार्थीस, त्यांच्या कार्यालयास हजर राहून, माहिती देण्यासाठी गेला असता व अपीलार्थीशी तेथून दूरध्वनीवरुन संपर्क साधला असता सदर माहिती अपीलार्थीने स्विकारण्यास दूरध्वनी वरुनच नकार दिला. तदनंतर दिनांक २९-१२-२००६ रोजी अपीलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे पाठविलेले या संदर्भातील पत्र देखील अपीलार्थीने स्विकारण्यास नकार दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले व त्याप्रित्यर्थ संबंधित रजिस्टर लिफाफा आयोगापुढे सादर केला.

अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून वरील प्रमाणे माहिती स्विकारण्यासाठी नकार देऊन जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-१२-२००६ अन्वये माहिती अधिकारी अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. अपीलार्थीने त्यांच्या मूळ अर्जानंतर अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्यास ३० दिवसा नंतर, प्रथम अपील करणे अपेक्षित

आहे तथापि अपीलार्थीने एक दिवस आधीच म्हणजेच दिनांक २७-१२-२००६ रोजी (३० दिवस पूर्ण होण्यापुर्वी) प्रथम अपील केल्याचे दिसून येते. सबब हे अपील अपरिपक्व ठरते.

या अपीलावर जन अपीलीय अधिकारी अधिकारी यांनी दिनांक १६-०१-२००७ रोजी सुनावणी घेऊन अपीलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती देण्यापोटी ५ दिवसाचा विलंब जन माहिती अधिकारी यांनी लावला असल्याचे अनुमान काढून जन माहिती अधिकारी व त्यांचे २ सहाय्यक यांना एकूण रुपये १२५० इतकी शास्ती लावण्यासाठी आयोगाकडे शिफारस केली आहे. या अपिल निर्णयामध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती २२२३ पृष्ठांची असल्याचा उल्लेख आहे.

जन अपीलीय अधिकारी यांच्या वरील अपील निर्णयावर समाधान न झाल्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीने माहिती अधिकारी अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०२-२००७ अन्वये व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिका-यास त्यांनी माहिती पुरविण्या पोटी केलेल्या ४९ दिवसाच्या विलंबामुळे त्यांना १२२५० रुपये इतकी शास्ती लावण्याची मागणी केली आहे. त्याच बरोबर जन अपीलीय अधिकारी यांनी केलेली शिफारस असमाधान कारक व नियमास धरुन परिपूर्ण नसल्याचे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर असे सांगितले की, अपीलार्थीने मागितलेली माहिती दिनांक २८-१२-२००६ रोजी त्यांच्याकडे तयार होती व ती माहिती पोस्टाने पाठविण्यापोटी जास्त खर्च लागणार होता व अपीलार्थी हे स्थानिक रहिवासी असल्यामुळे व पोस्टाचा खर्च टाळता येण्याजोगा असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील प्रतिनिधीने अपीलार्थी यांच्याकडे दिनांक २८-१२-२००६ व दिनांक २९-१२-२००६ या दोन्ही दिवशी व्यक्तीशः माहिती देण्याचा प्रयत्न केला तथापि ही

माहिती अपीलार्थी ने स्विकारण्यास नकार दिला व अपीलार्थीस माहिती मिळण्यास जो विलंब लागला त्यास संपूर्णतः अपीलार्थी हेच जबाबदार आहेत असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर स्पष्ट केले.

अपीलार्थीने मागणी केलेली माहिती ही सर्वसाधारण स्वरुपाची असून कोणत्या एका विशिष्ट कामासंबंधात केलेली नाही हे पाहता व बांधकाम विभागाकडे एकाच वेळी अनेक ठिकाणी चालू असलेल्या कामाचे स्वरुप व २२२३ ही पृष्ठ संख्या पाहता अपीलार्थीने मागणी केलेली माहिती ही मोठ्या स्वरुपाची होती असे म्हणता येईल. त्याच बरोबर अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कडे दिनांक २८-१२ व २९-१२ रोजी माहिती स्विकारण्यास दिलेल्या नकारामुळे त्यांना खरोखरच ही माहिती पाहिजे होती किंवा कसे याबाबत साशंकता निर्माण होते. अपीलार्थीने आज आयोगाकडे त्यांच्या दिनांक १२-०६-२००६ (अपीलार्थीच्या एकूण संदर्भावरुन सदर सन हा चुकीचा पडलेला असून तो २००६ ऐवजी २००७ असा असावा) च्या पत्रामध्ये त्यांनी मूळ मागणी केलेली संपूर्णतः माहिती त्यांना प्राप्त झाली असून त्यांचे आता समाधान झाले असल्याचे आयोगास कळविले आहे. वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले दिनांक १५-०२-२००७ चे व्दितीय अपील व जन अपिलीय अधिका-याने आयोगाकडे केलेली शिफारस फेटाळण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, अर्जदाराने ज्या पध्दतीने माहिती अपेक्षिली असेल शक्यतो, त्याच पध्दतीने अर्जदारास त्यांनी माहिती द्यावी. अर्जदाराने मागितलेल्या पध्दतीत विनाकारण बदल करण्याचा प्रयत्न इतःपर त्यांनी करु नये.

## <u>निर्णय</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १४ जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिपक ज्ञानोबा कांबळे, पंचायत समिती समोर, बालाजी फूट वेअर जवळ, मेनरोड, हनुमाननगर, अंबाजोगाई तालुका अंबाजोगाई जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग अंबाजोगाई तालुका अंबाजोगाई जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्रमांक २ जिल्हा परिषद बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## Iराज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३३२

निर्णय दिनांक १५-०६-२००७

सरदार हरजितसिंग तिरथसिंग सहानी, : अपीलार्थी

५-१-५५/१, उस्मानपुरा, तारा पान सेंटर

जवळ, औरंगाबाद

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, औरंगाबाद | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०६-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी श्री. सरदार हरजितसिंग तिरथसिंग सहानी (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार औरंगाबाद श्रीमती अपर्णा सोमानी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी औरंगाबाद श्री. आण्णासाहेब शिंदे (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील अर्ज दिनांक १३-०२-२००६ अन्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

"(१) करमसिंग जगतसिंग विरुध्द इंद्रकौर बाई हरनामसिंग यांची संचिका प्रकरण नंबर एमएजी/आरओआर/०६/७९ ची तपशीलवार माहिती कागदपत्रासह द्यावी.

(२) तहसील कार्यालयाचे आदेश क्रमांक ८३/एमएजी/आरओआर/२३, दिनांक ३०-०६-८३ ची माहिती."

अपीलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपीलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीचा कालावधी १६-०४-१९७९ ते १४-०८-१९७९ असा आहे.

अपीलार्थीच्या सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दिनांक १८-०२-२००६ चे पत्रानुसार अपीलार्थीस त्यांनी मागितलेल्या अर्जातील माहिती शोधण्याचे काम अभिलेख कक्षात चालू असून संबंधित संचिका प्राप्त होताच आपणास माहिती देण्यात येईल असे कळविले.

तथापि विहित कालावधीत अपीलार्थीस अपेक्षित असलेली संचिका न मिळाल्यामुळे अपीलार्थीने दिनांक ०१-०४-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे या प्रकरणातील प्रथम अपील केले.या अपीला मध्ये त्यांनी आपल्या माहितीची मूळ मागणी कायम ठेवली आहे.

अपीलार्थीच्या या अपीलाची सुनावणी जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०४-२००६ रोजी घेतली व या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी ८ दिवसाच्या आत अपीलार्थी यांनी मागितलेल्या संचिकाच्या प्रती उपलब्ध करुन देण्याचे सुचित केले.

तथापि जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी होऊन जन अपीलीय अधिकारी यांचा निर्णय प्राप्त होण्याच्या आधी म्हणजे दिनांक ०५-०४-२००६ रोजी अपीलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केलेले आहे.  तथापि ही तारीख चुकीने पडली असल्याचे अपीलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. हे अपील राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयात दिनांक ११-०५-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते.  सदर अपीलामध्ये अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिन रुपये २५० याप्रमाणे शास्ती लावावी अशी मागणी करुन आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने मागितलेली मुद्दा क्रमांक १ शी संदर्भित संचिका अपीलार्थीस दिनांक १०-०६-२००७ रोजी दाखविली तथापि सदर संचिकाची आवश्यक ती माहिती अपीलार्थीस प्रत्यक्षात आजतागायत ताब्यात मिळाल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. त्याच बरोबर अपीलार्थीने मागितलेल्या मुद्दा क्रमांक २ मध्ये संदर्भित केलेले आदेश जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातून पारीत झाले नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक १०-०६-२००७ रोजी कळविले आहे.

अपीलार्थीने मागितलेल्या मुद्दयाशी संबंधित मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात नस्ती न्यायालयीन कामानिमित्त अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने पाठविली होती तसेच सदरील नस्ती २७ वर्षापुर्वीची इतकी जुनी आहे त्यामुळे ही नस्ती जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाच्या अभिलेख कक्षातून शोधून काढून ती दिनांक १०-०६-२००७ रोजी अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. इतक्या विलंबाने माहिती दाखविण्याचे कारण म्हणजे सदर नस्ती खुप जुनी असल्यामुळे अभिलेख कक्षात व तेथून अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद येथे गेली होती व त्यामुळे सदर नस्तीचा मागोवा घेण्याकरिता वेळ लागला असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे.

दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकून घेवून असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद कडून सदर नस्ती प्राप्त करुन घ्यावी व हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत अपीलार्थीस हवी असलेली माहिती त्यांनी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपीलार्थीच्या मागणीतील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात सदर आदेश पारीत झाले नसल्यामुळे ही माहिती अपीलार्थीस देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती देण्यासंदर्भात लावलेला विलंब हा सदर नस्ती २७ वर्षापुर्वीची जुनी असल्यामुळे व अभिलेख कक्षात व जिल्हाधिकारी कार्यालयाशी सलग्न इतर कार्यालयात माहिती शोधून घ्यावयाची असल्यामुळे त्यांना वेळ लागला हे जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण आयोग मान्य करते तथापि त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे संदर्भातील पत्रव्यवहारास प्राधान्य देऊन अशा प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमामधील विहित कालावधीचे त्यांनी येथून पुढे कटाक्षाने पालन करावे असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.

सबब खालील प्रमाणे निर्णय पारित करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५ जून २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ सरदार हरजितसिंग तिरथसिंग सहानी, ५-१-५५/१, उस्मानपुरा, तारा पान सेंटर जवळ, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३६४/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक १५ जून, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.शरदचंद प्रभाकर सुपेकर,<br>राहणार- आदिती, शिवाजीनगर,<br>परभणी. | .. | अपिलार्थी. |
| | विरुध्द | | |
| १. | जनमाहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, परभणी | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलिय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (साप्रवि) तथा प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>औरंगाबाद. | .. | |

## <u>विवेचन</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १५ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.शरदचंद्र प्रभाकर सुपेकर (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) , जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी, श्री.के.एन.कुंभार, ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) जनअपिलिय अधिकारी तथा उपआयुक्त(साप्रवि) तथा प्रादेशिक

संचालक नगर परिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद, श्री.डी.एम.मुगळीकर, ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्वप्रथम अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक- ०१-११-२००६ रोजी अर्ज करुन खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> " नगर परिषदेने १ जानेवारी, २००६ ते १५ ऑक्टोंबर, २००६ दिलेल्या जाहिराती व वर्तमान पत्र क्रमांकाने तारखेसह दिलेल्या जाहिराती तसेच ती जाहिरात ज्या नियतकालीकेत दिली त्यांचे प्रसिध्दीचे शासन मान्य दर व आपल्या कार्यालयाकडून मंजुर केलेली रक्कम. आपल्या कार्यालयाकडून दिलेल्या व प्रसिध्द झालेल्या जाहिराती बाबत त्या त्या संबंधी आलेल्या बीलांचा दिनांक व रक्कम आपल्या कार्यालयाकडून अंतर्गत लेखा परिक्षकाकडून त्यातील कापलेली रक्कम, शेरा, हा सविस्तर तपशील. "

सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीकडून सदर माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत अपिलार्थीस कोणतीच माहिती पुरविली नाही. त्यामूळे अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०९-१२-२००६ रोजी प्रथम अपिल केले. अपिलार्थीने केलेला अपिल अर्ज, जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक- १४-१२-२००६ रोजी प्रत्यक्ष प्राप्त झाला. सदर अपिलाची

सुनावणी जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २९-१२-२००६ व १०-०१-२००७ रोजी घेतली. जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलाचा निर्णय दिनांक- २३-०१-२००७ रोजी अंतीम केला. या निर्णयामध्ये जनअपिलीय अधिकारी यांनी शासकीय माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळमाहितीच्या अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती सात दिवसाच्या आत विनामुल्य पुरविण्याचे सूचीत केले.

तथापि जनअपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने समाधान न झाल्यामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १५-०२-२००७ रोजी व्दितीय अपिल सादर केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज दिनांक- १५ जून, २००७ रोजी झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रथमतः माहितीची मागणी केलेल्या अर्जावर पहिल्या तीस दिवसात जनमाहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. पहिल्या तीस दिवसात कोणतीही कार्यवाही न होण्याचे कारण, जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती ही नगरपरिषदेच्या वेगवेगळया शाखेतून त्यांना एकत्रीत करावी लागली व त्याचवेळी नगरपरिषदेची सार्वत्रीक निवडणूक घोषीत केली गेली असल्याचे सांगून, ही माहिती गोळा करण्यास थोडा उशिर झाला, हे जनमाहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले आहे की, त्यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेली सर्व माहिती दिनांक- ३०-१२-२००६ रोजी पुरविली असून अपिलार्थीने अपिलाच्या सुनावणीमध्ये अतिरीक्त

माहितीचा जो अर्ज दाखल केला आहे. त्यास अनुसरुन  अतिरीक्त माहिती देखिल अपिलार्थीस दाखविली आहे. जनअपिलिय अधिकारी यांच्याकडे झालेल्या प्रथम सुनावणीमध्ये अपिलार्थीने सदर बीलावरती लेखापरिक्षणाने घेतलेले शेरे मागितली होती. तथापि हे शेरे अपिलार्थीस लेखी कळविण्या ऐवजी प्रत्यक्ष कागदपत्रे जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- ०५-०२-२००७ रोजी दाखविली. जनमाहिती अधिकारी यांनी हे शेरे अपिलार्थीस दाखविल्याचे, हे आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थी कबूल करीत आहे. त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीवरुन त्यांचे आता समाधान झाले असल्याचे अपिलार्थी यांनी आयोगासमोर कबुल केले आहे. वास्तविक लेखापरिक्षणाने घेतलेल्या आक्षेपाची झेरॉक्सप्रत जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे सहज शक्य होते परंतू  जनमाहिती अधिकारी यांनी तसे न करता अपिलार्थीस लेखापरिक्षणाचे शेरे दाखविले. जनमाहिती अधिकारी यांची ही कृती अपिलार्थीने मूळमाहितीच्या अर्जाव्दारे केलेल्या मागणीशी विसंगत आहे.

अपिलार्थीस जरी आता ही माहिती मिळाली असली व अपिलार्थीचे समाधान झाले असले तरी ही माहिती अपिलार्थीस दिनांक- ३०-११-२००६ रोजी मिळावयास पाहिजे होती. तथापि ही माहिती अपिलार्थीस दिनांक- ३०-१२-२००६ व ०५-०२-२००७ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी पुरविली आहे. या प्रकरणामध्ये मूळ माहिती देण्यास ३० दिवस इतका विलंब झाल्याचे कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि या काळामध्ये नगरपरिषदेच्या सार्वत्रीक निवडणूका असल्यामूळे, जनमाहिती अधिकारी यांना या प्रकरणाकडे आवश्यक तो वेळ देता आला नाही. हे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आयोग अंशतः मान्य करीत आहे. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून झालेला उशिर  कोणत्याही असदहेतूने झाला नसल्यामूळे त्यांच्यावर शास्ती लावण्या

संदर्भात कार्यवाही करण्याचे आदेश नाहीत. तथापि जनमाहिती अधिकारी यांनी ही माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाप्रित्यर्थ **“त्यांनी अशा प्रकारची कृती येवून पुढे टाळावी.” अशी सक्त ताकीद त्यांना आयोगातर्फे देण्यात येत आहे.** वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर हे अपिल निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१६. अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

१७. जनमाहिती अधिकारी यांनी ही माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाप्रित्यर्थ “त्यांनी अशा प्रकारची कृती येवून पुढे टाळावी.” अशी सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक १५ जून,२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ अपिलार्थी, शरदचंद्र प्रभाकर सुपेकर, राहणार- आदिती, शिवाजीनगर, परभणी.

२ जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा, उपआयुक्त(साप्रवि) तथा प्रादेशिक संचालक नगर परिषद प्रशासन विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३६५/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक १५ जून, २००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.गोपाळ तुकारामपंत देव,<br>राहणार-केळीबाजार,<br>सुपारी हनुमान रोड, औरंगाबाद. | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जनमाहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, औरंगाबाद. | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलिय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद. | .. | |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १५ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.गोपाळ तुकारामपंत देव (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) , जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद, श्रीमती.अपर्णा सोमानी, ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जनअपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद, श्री.अे.एम.शिंदे ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम जनमाहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०८-११-२००६ रोजीचे अर्जान्वये औरंगाबाद येथील सर्व्हेनंबर ८३ व ९१ च्या मालकी हक्क व खरेदीविक्री संबंधात एकूण ८, मुद्यांवर माहिती मागितली आहे. हया आठ मुद्यांपैकी बहुतांश मुद्दे जनमाहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण मागविणारे व प्रश्नार्थक स्वरुपात आहेत. या मुद्यापैकी मुद्दा क्रमांक- ४,५ व ८ वर या तीन मुद्यामध्ये त्यांनी सन १९७६ ते २००६ पर्यंत शेतसारा भरलेल्या पावतीची प्रत व या भूखंडावर जी अनाधिकृतपणे बांधकामे झाली. त्या सर्व घराकरिता लावलेल्या अकृषीक करा सबंधात माहिती मागविली आहे.

सदर माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तीशः अपेक्षिली आहे.

या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील पत्र जा.क्र. ०६/जमा/२/कावी/९५, दिनांक- ०३-१२-२००६ अन्वये, अपिलार्थीने मागणी केलेले सर्व मुद्दे प्रश्नार्थक स्वरुपाचे असल्यामूळे अपिलार्थीस माहिती नाकारली आहे. या पत्रामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे अर्जात सात मुद्यांचा समावेश असल्याचे म्हटले आहे ते चूक आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने दिनांक- ०६-१२-२००६ रोजी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल अर्ज केला. हे अपिल करण्या मागचे कारण. अपिलार्थीने, "असमाधानकारक उत्तर व अपूर्ण माहिती," असे दिले आहे. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- १७-०१-२००७ रोजी सुनावणी घेतली व जनमाहिती

अधिकारी यांनी  अपिलार्थीस प्रश्नार्थक  स्वरुपाची माहिती सोडून इतर उपलब्ध सर्व कागदपत्राच्या झेरॉक्सप्रती आठ दिवसात देण्याचे सूचीत केले आहे.

तथापि त्यावर काहीच कार्यवाही न झाल्यामूळे अपिलार्थीनी व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०८-०२-२००७ रोजी  व्दितीय अपिल केले आहे. या अपिलाचे कारण, अपिलार्थीने असमाधानकारक उत्तर,अपूर्ण  माहिती व कागदपत्राच्या प्रती दिल्या नाहीत, असे दर्शवून, अपिलार्थीने मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये, जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असा मुद्या  मांडला की, अपिलार्थी यांनी याच विषयावर वेळोवेळी  अपिले दाखल केली आहेत व त्या अपिल अर्जाच्या संदर्भात अपिलार्थीनी जी माहिती पुरविली आहे, त्या माहितीमध्ये अपिलार्थीस वरील अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीचा समावेश होत आहे. या जमिनीच्या व्यवहार व मालकी हक्का संदर्भात अपिलार्थीने या पूर्वीही आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले होते. त्यावेळी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते व ती चौकशी ही आता सुरु होत आहे. जिल्हाधिका-यांनी या भूखंडा संदर्भात माहिती आयोगाच्या वेगळया निर्णयास अनुसरुन चौकशी सुरु केली आहे. त्या चौकशीच्या व्याप्तीमध्ये आजच्या अपिलार्थीच्या मुद्यांचाही समावेश करावा, असे जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना सूचित करण्यात येत आहे.

मूळात अपिलार्थीने एकूण आठ मुद्यांवर माहिती मागितली असता त्यांना या संदर्भात दिलेल्या उत्तरामध्ये फक्त सात मुद्यांचा संदर्भ करणे ही जनमाहिती अधिकारी यांची कृती गैर ठरते. यावरुन अपिलार्थीचा अर्ज त्यांनी आवश्यक त्या गांभिर्याने विचारात घेतला नसल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने मागविलेल्या वरील ३ मुद्यावरील (मुद्या क्र. ४,५ व ८) माहिती जनमाहिती अधिकारी यांनी, आवश्यक असल्यास, वेगवेगळया नस्त्यांवरुन संकलित करणे जनमाहिती अधिकारी यांना सहज शक्य आहे असे आयोगाचे मत आहे.

सबब असेही आदेशीत करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीन दिवसाच्या आत वरील तीन मुद्यावरील माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीने लेखी मागणी केल्यास या जमिनीच्या व्यवहारा संबंधित सर्व नस्त्या अपिलार्थीस प्राधान्याने उपलब्ध करुन द्याव्यात.

## <u>निर्णय</u>

१८. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

१९. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीन दिवसाच्या आत वरील तीन मुद्यावरील माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीने लेखी मागणी केल्यास या जमिनीच्या सर्व व्यवहारा संबंधीत नस्त्या अपिलार्थीस प्राधान्याने उपलब्ध करुन द्याव्यात.

औरंगाबाद
दिनांक १५ जून,२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ अपिलार्थी, श्री.गोपाळ तुकारामपंत देव, राहणार-केळीबाजार, सुपारी हनुमानरोड, औरंगाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार,औरंगाबाद,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा, उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३६७/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक १५ जून, २००७

१. श्री.गजानन बी.पाटील .. अपिलार्थी.
एल ७५/३, शिवाजी नगर,
हडको,एन-९, स्वामीसमर्थ,
औरंगाबाद.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी

कार्यकारी अभियंता-१,
महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी
परीमंडळ कार्यालय,औरंगाबाद.

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
कार्यकारी अभियंता-२,
महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी
परीमंडळ कार्यालय,औरंगाबाद.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १५ जून,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री.गजानन बी.पाटील (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता-२, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी परीमंडळ कार्यालय, औरंगाबाद, श्री. किशोर सुखदेव शेगोकर, ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जनअपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता-१, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी परीमंडळ कार्यालय, औरंगाबाद, श्री.अ.नि.सोनवणे, ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक- २०-१०-२००५ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे तालूका मुख्यालय, गंगापूर, जिल्हा- औरंगाबाद येथे शहरवस्तीत जुन्या ३ के.व्ही केंद्रामध्ये झालेल्या नविन बांधकामा संदर्भात काही माहिती मागविली होती. त्यांच्या माहितीतील मुद्दे - बांधकामांचे नव्याने झालेले बांधकाम व संरक्षक भिंत याची निवीदा संख्या, मंजुर निवीदेची रक्कम, काम पुर्ण करण्याचा कालावधी, निवीदा मंजूर झालेल्या कंत्राटदाराचे नाव व वर्गनिहाय निवीदा

मागवण्यासाठी दिलेल्या जाहीरातीची नक्कल, संबंधित तांत्रिक बांधकाम (एपीआर-डीपीआर) व संरक्षक भिंतीचे बांधकामाच्या मंजुर नकाशाची प्रत, संबंधीत बांधकाम राज्य महामार्ग लगत असल्यामुळे, सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिका-याकडून घेतलेल्या नाहरकत प्रमाणपत्राची झेरॉक्सप्रत, नगरपरिषद, गंगापूर यांच्याकडील बांधकाम परवानगीची प्रत, काम सुरु झाल्याचा दिनांक, पुर्ण झाल्याचा दिनांक, कामांच्या पुर्णत्वाच्या दाखल्याची प्रत, बांधकामाची मोजमाप पुस्तिकाची प्रत, या बांधकामा संबंधी विद्युत मंडळाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीची झेरॉक्सप्रत व त्या तक्रारीवर विद्युत कंपनीच्या संबंधित अधिका-यांने संबंधित अर्जदारास केलेला खुलासा व त्याची सत्यप्रत, संबंधित बांधकामासाठी मंजूर झालेला निधी व खर्च झालेला निधी, शासनाच्या विशेष निधीतून करण्यात येणा-या एकूण के.व्ही उपकेंद्राची संख्या, असे आहेत.

अपिलार्थीने सदर माहिती प्रत्यक्ष अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या वरील माहितीच्या मागणीच्या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- १८-११-२००५ च्या पत्रान्वये, अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीवर मुद्देनिहाय चर्चा करण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे. या पत्रामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपस्थित राहण्यासाठी ठिकाण व तारीख, वेळ कळविल्याचे दिसून येत नाही.

सदर पत्र अपिलार्थीस दिनांक- ०१-१२-२००५ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १४-१२-२००५ रोजी प्रथम अपिल केले. सदर अपिलामध्ये अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जातील मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जनमाहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची विनंती केली आहे.

सदर अपिलाची सुनावणी जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- ०५-०१-२००६ रोजी घेवून अपिलार्थीचे अपिल फेटाळले व अपिलार्थीस जर खरोखर माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे जनहितार्थासाठी माहिती हवी असेल तर अपिलकाराने व्यक्तीशः जनमाहिती अधिका-याकडे जावून मुद्देनिहाय चर्चा करावी, असे अपिलार्थीस सूचीत केले व जनमाहिती अधिका-यास, जर गंगापूर उपकेंद्राला धोका संभवत नसेल आणि अधिकाधिक लोकहिताची हमी मिळत असेल तर शक्य तीतकी उपलब्ध होण्याजोगी माहिती पंधरा दिवसात अपिलार्थीस देण्याचे सूचीत केले.

सदर निर्णय अपिलार्थीस जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- २० जानेवारी, २००६ रोजीच्या पत्राने पाठविला व तो अपिलार्थीस प्राप्त झाला आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १८-०४-२००६ रोजी व्दितीय अपिल केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिका-या विरुध्द

त्यांना लागू असलेल्या सेवानियमा प्रमाणे शिस्तभंगाची कारवाई आदेशीत करण्याची राज्य माहिती आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे जनमाहिती अधिका-यास सर्व साधारण परिस्थतीत, काही अडचण असू नये. अपिलार्थीने माहिती मागितलेल्या अर्जातील भाषा क्लिष्ट असून त्यामध्ये अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती हवी आहे, यांचा जनमाहिती अधिका-यास निश्चीतपणे बोध न झाल्यामूळे त्यांनी अपिलार्थीस कार्यालयात बोलाविले होते. त्याचबरोबर अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन, दिनांक- २२-११-२००६ रोजी श्री.मो.दि.झोडे, मुख्य अभियंता व श्री.के.एस.शेगोकार, माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष गंगापूर उपकेंद्राला अपिलार्थीचे उपस्थितीमध्ये भेट दिली आहे व येणे प्रमाणे अपिलार्थीस त्यांचे अर्जासंदर्भात प्रतिसाद देण्याचा त्यांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते.

अपिलार्थीचे अपिल फेटाळतांना जनअपिलिय अधिकारी यांनी ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, गंगापूर या उपकेंद्राची माहिती उघड केल्याने भविष्यात जर धोका झाला तर त्या उपकेंद्राशी निगडीत असलेल्या ग्राहकाचे हक्क धोक्यात येवू शकतात. त्याच बरोबर अपिलार्थीने मागितलेली माहिती मानवी हक्काचे उल्लंघन करण्याच्या अभिकथनाशी संबंधीत आहे असे अपिलीय अधिका-यांना वाटते, असे म्हटले आहे.

तथापि जनअपिलीय अधिकारी यांचे हे म्हणणे आयोगास मान्य नाही. कारण अपिलार्थीने जी माहिती मागविली आहे. त्यामध्ये या उपकेंद्राच्या बांधकामासाठी वेगवेगळ्या शासकीय प्राधिकरणाकडून कोणती नाहरकत प्रमाणपत्र मिळविली त्याच्या

प्रती, प्राप्त निवीदांचा तपशील, तुलनात्मक विवरणपत्र, बांधकामाची मोजमाप पुस्तिका इत्यादी प्रकारच्या मुद्यांचा समावेश आहे. या माहितीमूळे कोणत्याही मानवीहक्कांचे उल्लंघन होईल, कोणाच्या जिवास धोका होईल अथवा उपकेंद्राला धोका प्राप्त होईल, असे आयोगास वाटत नाही. त्याचबरोबर जनअपीलय अधिकारी यांनी त्यांच्याकडे या प्रकरणी प्राप्त झालेल्या प्रथम अपिलाच्या जनअपिलीय अधिकारी यांच्या विवेंचनावर अपिलार्थी यांनी काही आक्षेप घेतले आहेत व अपिलार्थी यांनी न केलेली विधाने जनअपिलिय अधिकारी यांनी अपिलामध्ये घातल्याचे ते आज सुनावणीमध्ये सांगत आहेत.

दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकला असता, असे आदेशीत करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळमाहितीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली सर्व माहिती दहा दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी. त्याच बरोबर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्याकरिता जाणूनबजून टाळाटाळ केली किंवा ती नाकारण्यामध्ये काही असदहेतू होता, असे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. त्यामूळे जनमाहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावता येत नाही. तथापि जनमाहिती अधिकारी यांनी येथून पुढे प्राप्त होणा-या माहितीच्या अर्जावर, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार विहीत केलेल्या कालावधीमध्ये सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे त्यांना सूचीत करण्यात येत आहे.

## निर्णय

४. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दहा दिवसाच्या आत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद
दिनांक-१५ जून, २००७.
प्रति,

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

१ श्री.गजानन बी.पाटील,घर नंबर- एल ७५/३, शिवाजीनगर, हडको, एन-९, स्वामीसमर्थ मंदीराजवळ, औरंगाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता-२, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी परीमंडळ कार्यालय,औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा, कार्यकारी अभियंता-१, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी परीमंडळ कार्यालय,औरंगाबाद, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.